बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)


दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ४९ | बुधवार, दि.१३ नोव्हेबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


## जातनिहाय जनगणना करुन,५० टक्के आरक्षणाची मर्यादा हटविणार-खा.राहुल गांधी



गोंदियाः–द्वेषाला द्वेषाने कापता येत नाही,तर प्रेमाने व्देषावर अंकुश लावता येऊ शकते,त्यामुळे आम्ही व्देषाचे राजकारण करत नाही तर प्रेमाचे राजकारण करतो.संविधानाची रक्षा करण्याकरीता ही लढाई असून भाजप आरएसएस दरदिवशी संविधान संपवण्याचे काम करते.परंतु आपण संविधानाची दरदिवशी रक्षा करण्याचे काम करीत आहात. महाराष्ट्र ही थोरसंताची कर्मभुमी आहे.त्यातच विदर्भ व महाराष्ट्रात येताच आपल्या डोक्यात काँग्रेसची विचारधार दिसून येते.मोदीजी म्हणतात लाल रंगवाले संविधान दाखवतात.आम्हाला ९० टक्के कामगार,शेतकरी,युवक,युवती महिलांचा मान जपायचे आहे.

या संविधानात फुले, आंबेडकर, गौतम बुध्द, बसवराजसारख्या महापुरुषांचे विचार नाहीत का.शिवाजी महाराज जे म्हणायचे ते या संविधानात आहे.एकता,प्रेम ,समानता,प्रत्येक धर्माचा आदर आहे.उलट मारहाण,शिविगाळ असा गोष्टींचा याठिकाणी कुठेच उल्लेख नाही.प्रधानमंत्री मोदीनी या संविधानाचे वाचनच केले नाही.त्यांनी वाचले असते तर नक्की त्यांनी संविधानाचा आदर केला असता.२४ तास नरेंद्र मोदी व आरएसएसचे लोक संविधानावर टिप्पणी करीत असतात.देशातील सर्व केंद्रीय विद्यापीठात कुलगुरु निवडतात,उत्पादीत मालाला एमएसपी देत नाही.अदानी अंबानी सारख्या उद्योगपतींचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ करा असे कुठे लिहिले आहे.भाजप,आरएसएस व नरेंद्र मोदी हे संविधान संपवायला निघालेत हे सत्य कुणीही नाकारत नाही.त्यामुळेच ते बंद खोलीत संविधानाची लपुनछपून हत्या करीत असल्याची टिका काँग्रेसचे राष्ट्रीय नेते खासदार राहुल गांधी यांनी केली.

ते गोंदिया येथील सर्कस मैदानावर गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांच्यासह तिरोडा येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार रविकांत बोपचे,आमगाव–देवरी मतदारसंघाचे उमेदवार काँग्रेस राजकुमार पुराम व अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेदवार दिलीप बनसोड यांच्या प्रचार सभेत बोलत होते.

या सभेला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार प्रशांत पडोळे, मध्यप्रदेशचे माजी आमदार हिना कावरे,बालाघाटचे आमदार अनुभा मुंजारे, वारासिवनीचे आमदार विक्की पटेल, परसवाडाचे आमदार मधुभाऊ भगत, माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सौरभ रोकडे, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाध्यक्ष पंकज यादव, शैलेश जायस्वाल, माजी आमदार रमेशभाऊ कुथे,कॉंग्रेस पर्यवेक्षक शिव डहरिया,अमर वराडे,वंदना काळे,राजकुमार कुथे,शिवसेना नेता अजयसिंह राजपूत,बाजार समितीचे उपसभापती राजकुमार पटले,अशोक गुप्ता,माजी जि.प.अध्यक्ष एड.के.आर .शेंडे,पी.जी.कटरे,जितेश राणे,बाबा बागडे,शकिल मंसुरी,राकेश ठाकूर,पुरुषोत्तम कटरे,प्रफुल अग्रवाल,आलोक मोंहती,राजीव ठकरेले,निलम हलमारे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.



पुढे राहुल गांधी म्हणाले की,देश हळूहळू मोदींजी उद्योगपतींच्या हा–तात सोपवत आहेत.महाराष्ट्रातील धारावीतील कोट्यवधीची जमीन अदानीला देत आहेत.मोदीजी अद–ानी अंबानींचे आहेत,मी मात्र तुमचा आहे.अनु.जाती १५,आदिवासी ८ टक्के पण ओबीसी किती टक्के आहे.पण ते नेमके किती कुणालाच माहित नाही.या सर्वांना जोडले तर ९० टक्के होते.भारतात ५० टक्केवर ओबीसींची संख्या आहे. मोदीजी स्वतःला ओबीसी सांगत फि रतात,ओबीसींचा अपमान झाल्याचे म्हणतात.

परंतु सर्वात मोठा ओबीसींचा अपमान कोण करतोय.सर्वात जास्त जीएसटी ९० टक्के जनता देते,हा समाज मागासवर्ग समाज आहे.आपला जो धन आहे,तो वाटला जात आहे.अर्थ,नियोजन व प्रधानमंत्री कार्यालयातील ९० अधिकार फक्त नियोजन करतात कुणाला किती निधी द्यायचे व काय करायचे.५० टक्के ओबीसींची संख्या पण निर्णय प्रक्रियेत ५ टक्केंचाही सहभाग नाही,हा आहे,ओबीसींचा अपमान.

लोकसभेत काँग्रेस जातनिहाय जनगणना करण्याच्या मागणीवर ठाम राहणार आहे.दलीत,आदिवासी व ओबीसींचा किती पैसा हिसकावला जात आहे,हे जातनिहाय जनगण–नेतून समोर येणार आहे.देशातील विविध संस्थामध्ये मागास समाजाला किती टक्के जागा आहेत याचे आकडे बाहेर येतील.प्रसारमाध्यम,देशातील २०० उद्योगात मागासवर्ग किती आहेत यामध्ये बघितले तर एकही मागासवर्गातील व्यक्ती दिसून येत नाही.सर्वच खासगीकरण होत आहे,त्यामुळे मागासवर्गातील लोकांचे अधिकार हिरावून घेतले आहे.आरक्षणाची ५० टक्के मर्यादा लावली आहे,ती आम्ही हटवणार आहोत.

छत्तीसगड,कर्नाटक,तेलंगणात आम्ही जे बोलले ते केले वाटल्यात तुम्ही तपासून घ्या.धान,सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकर्याना न्याय देण्याच्या प्रयत्न करु.अदानी अंबानी रोजगार देऊ शकत नाही,तर लहान व मध्यम उद्योजक रोजगार देऊ शकतो.परंतु केंद्रातील सरकारने लहान व मध्यम उद्योजकांच्या बाबतीत विरोधी धोरण अवलंबल्याने बेरोजगारांची संख्या वाढली आहे.




यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की,राज्यात जे काही वातावरण आहे ते बघता महाविकास आघाडी राज्यात सत्त–ेवर येत असल्याचे चित्र जनतेच्या मनात असल्याचे वातावरण आहे.महायुतीमधील घटक पक्षाच्या विरोधात मतदारांचा रोष दिसून येत आहे.युवकांना बेरोजगार केले,म हागाईने उच्चांक गाठला.सोबतच येथील आमदारच ठेकेदार असल्याने विकास कसा असेल हे सांगायची गरज नसल्याचे म्हणाले.मोदीजींनी जिथे जिथे हात लावले त्याठिकाणी भ्रष्टाचाराने बांधलेल्या कामाचे पितळ उघडे पडले आहे.

गोंदिया–भंडारा जिल्ह्याला पहिल्या टप्प्यातच १०० टक्के सिंचनाचा लाभ देण्याचे काम सरकार येताच होणार आहे.शेतीवर आधारीत उद्योग आम्ही आपल्या क्षेत्रात निर्माण करण्यावर भर आहे.काही व्यक्ती आमच्यासोबत राहून अमीर झाले.परंतु जेव्हा त्यांच्यावर टांगती तलवार आली तेव्हा ते भाजपसोबत गेले आणि काँग्रेसमुक्तीचा भाषा बोलतात.मी या सभेतूनच बोलतो काँग्रेसमुक्त गोंदिया भंडारा नव्हे तर भाजपमुक्त करणार.तुम्ही स्वतःला विकासपुरुष म्हणता परंतु या जिल्ह्याचा विकास न करता विकास खुंटवण्याचे काम केले.आमच्या जिल्ह्याना मागासलेपणाचा जो डाग लागला तो पुसण्याचे काम आम्ही करणार असल्याचे पटोले म्हणाले.

यावेळी बोलतांना काँग्रेस उमेदवार गोपालदास अग्रवाल म्हणाले की,पाच वर्षापुर्वी झालेली चुक दुरुस्त करीत मनुवादी विच–ारसरणीला सोडून परत मी आपल्या पक्षात पुन्हा परत आलो आहे.म ाझ्याकडून झालेली चुक दुरुस्त करण्याकरीता गोंदिया विधानसभा मतदारसंघात ४५० किलोमीटर अंतराची पदयात्रा काढून काँग्रेसला पुन्हा ताकदीने उभे करण्याचे काम प्रायश्चित म्हणून केले.या आधीही सोनियाजी आल्या आणि काँग्रेसला विजय मिळालेला होता.

आता यावेळी आपण आलात राहुलजी आम्ही सर्व जागावंर विजयी होणार.येथील सरकार धानाला भाव मिळत नाही.येथील स्थानिक आमदाराच्या एका कार्यकर्त्याच्या संस्थेने शेतकर्यांच्या धानाचे कोट्यावधी रुपये हडपले.आपल्या नेतृत्वातच संविधानाची रक्षा होऊ शकते.शेतकरी,युवा,बेरोजगारांच्या विकासाची गोष्ट होऊ शकते.

ओबीसींना लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना आरक्षण मिळावे याकरीता आम्ही आपल्यासोबत आहोत.तसेच गोंदिया जिल्ह्याला सिंचनात समृध्द करण्याकरीता काम करायचे असून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आणण्याकरीता सर्वांना महाविकास आघाडीला सहकार्य करावे असे आवाहनही अग्राल यांनी केले.

यावेळी बोलतांना खासदार डॉ.प्रशांत पडोळे म्हणाले की,देशात दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न जेव्हा करण्यात आला.तेव्हा आपण देशातील जनतेत जाऊन प्रेमाचा संदेश दिला.राहुलजी आपला आवाज म्हणजेच न्याय व संघर्षाचा नारा आहे.महाविकास आघाडी समाजाच्या उत्थानाकरीता काम करण्याकरीता आहे.महायुती रुपी नरकासुरचा वध करुन महाविकास आघाडीचे राज्य आणावे असे म्हणाले.तसेच मंचावरील अनेक मान्यवरांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. संचालन अपुर्व अग्रवाल यांनी केले,तर आभार अमर वराडे यांनी मानले.

## समाजघटकांचा सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने एकत्र येऊन कार्य करु-पंतप्रधान नरेंद्र मोदी



**चिमूर**–आपल्या देशाची अर्थव्यवस्था आज जगात पाचव्या क्रमांकावर आहे. येत्या काळात आपली अर्थव्यवस्था जगातील पहिल्या तीन सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये सामील होईल. महायुतीच्या माध्यमातून आम्ही सर्व समाजघटकांचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने एकत्र येऊन कार्य करत आहोत,असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.पूर्व विदर्भातील चिमूर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या उपस्थितीत महायुतीची विशाल जनसभा आज आयोजित करण्यात आली होती. या सभेला विदर्भातील महायुतीचे प्रमुख नेते, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेत सर्व उपस्थित कार्यकर्ते, पदाधिकारी व जनतेशी संवाद साधला.

मागील वर्षी धान उत्प–ादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २०,००० रुपये बोनस देण्याचे कार्य महायुतीने केले आहे, ज्याचा शेतकऱ्यांना मोठा लाभ मिळाला आहे. याव्यतिरिक्त शेतकऱ्यांना मिळणारा हमीभाव वाढवण्यात आला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना अधिक आर्थिक लाभ होईल.

केंद्र आणि राज्य सरकार एकत्रितपणे राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करत आहे. भविष्यातही राज्याचा विकास अबाधित ठेवण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील राहू. त्यासाठी येत्या २० नोव्हेंबरला होणाऱ्या निवडणुकीत महायुतीच्या सर्व उम ेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन केले.

## गुड्डू बोपचेंची प्रचारात सरसी; प्रस्थापित आमदारांचे वाढविले टेन्शन!

### भाजप कार्यकर्त्यांकडून नामदाराची हवा; मतदारांना मात्र नवीन आमदार हवा

**गोंदिया:** – विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून या अनुषंगाने जिल्ह्यात सर्वच पक्षाकडून प्रच–ाराला धडक सुरुवात झालेली आहे. तिरोडा– गोरेगांव विधानसभा क्षेत्रातही २०१९ च्या निवडणुकीतील प्रमुख पक्षांचे दोन्ही उमेदवार याही वेळेला एकमेकांसमोर उभे ठाकले असून दोघांनीही निवडणुकीच्या प्रचारात आघाडी घेण्यासाठी कंबर कसल्याचे दिसून येत आहे. महायुतीच्या मागील दहा वर्षांच्या प्रस्थापित आमदाराविरुद्ध महा विकास आघाडीच्या नवख्या उमेदवाराची सरसी पहावयास मिळत असल्याने प्रस्थापित आमदारांचे मात्र टेन्शन वाढले असल्याचे जाणवत आहे.

तिरोडा–गोरेगांव विधानसभा मतदार संघात यावेळी महायुती कडून भाजपचे मागील दहा वर्षांपासूनचे आमदार असलेले विजय रहांगडाले हे तर महाविकास आघाडीकडून मागील निवडणुकीत पराभव पत्करावा लागलेले रविकांत (गुड्डू) बोपचे पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. प्रच–ाराला सुरुवात आठवडा भरापेक्षा जास्तीचा कालावधी झालेला असून आता प्रचार शिगेला पोहोचला आहे. यात महाविकास आघाडीतील घटक पक्षाच्या बळावर गुड्डू बोपचे यांची प्रचारात सरसी असल्याचे मतदारांचे म्हणणे आहे.



भाजप उमेदवार विजय रहांगडाले यांनीही प्रचारात आघाडी घेतली असली तरी त्यांच्या प्रचारात कंत्राटदार व पदाधिकारी यांची संख्या जास्त असल्याचे बोलले जात आहे. त्या तुलनेत गुड्डू बोपचे यांच्याकडे सामान्य मतदारांची संख्या जास्त असल्याने त्याचा फायदा निवडणुकीच्या निकालावर पडणार असल्याचे बोलले जात आहे.

मागील निवडणुकीत रविकांत (गुड्डू)बोपचे यांना स्वतच्या गोरेगाव तालुक्यातील मतदार संघातून हवी तशी आघाडी घेण्यात अपयश आले होते. मात्र यावेळी सोनी, शहारवाणी, कुऱ्हाडी व गोरेगांव भागात त्यांच्या यात्रेला मिळत असलेला जनसमर्थन पाहता या भागातून यावेळी लीड घेणार असल्याचे चित्र जाणवत आहे.

भाजप कार्यकर्त्यांकडून अब की बार.... नामदार अशा घोषणा देत प्रचार केला जात आहे. मात्र मागील २०१९ च्या निवडणुकीत भंडारा व गोंदिया जिल्ह्यातून एकमेव आमदार म्हणून निवडून आलेल्या विजय रहांगडाले यांना मंत्रिपद न देता बाहेरचा पालकमंत्री आयात करावा लागला होता. भाजपमध्ये पोवार समाजातील नेत्यांचे नागपूरकर नेत्यांकडून पंख छाटण्याचे काम केले जात असताना आता मात्र निवडणुकीपुरता लॉलीपॉप असल्याचे बोलले जात आहे.

विशेष म्हणजे विद्यमान आमदार व महायुतीचे उमेदवार असलेले विजय रहांगडाले यांना क्षेत्राच्या विकासासाठी दहा वर्षांचा कालावधी मिळाला असताना व त्यातही भाजपची सत्ता असताना निधी खेचून आणण्यात हवे तसे यश मिळाले नाही, ही सत्यता कोणीही नाकारू शकत नाही. त्यामुळे ही निवडणुक महायुतीच्या उमेदवाराला जड तर जाणार नाही ना? अशी कुजबूज मतदारांमध्ये होत आहे.

## अर्जुनी मोरगाव मतदारसंघाच्या विकासाचा रोड मॅप आहे तयार-राजकुमार बडोले



**गोंदिया:** अर्जुनी मोरगाव मतदारसंघ हा दुर्गम, आदिवासी बहूल आहे. या भागात धान, मक्याचे उत्पादन सर्वाधिक घेतले जाते. पण त्यावर प्रक्रिया उद्योगांचा अभाव आहे. येथे निसर्गाने मुक्त हस्ताने उधळण केली असून पर्यटन विकासाला संधी आहे. तलाव व जलाशयांमुळे मत्स्य व्यवसायाला चालना मिळू शकते. महायुती सरकारकडे विकासाची दूरदृष्टी आहे. खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यासारखे विकासाचे व्हिजन असण–ारे नेते आहेत. अर्जुनी मोरगाव मतदारसंघाच्या विकासाचा रोड मॅप तयार असून मतदारांच्या साथीने हा रोड मॅप प्रत्यक्षात साकारण्याचा आपला प्रयत्न असणार असल्याचे अर्जुनी मोरगाव मतदारसंघाचे महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पटाचे उमेदवार राजकुमार बडोले यांनी सांगितले.

### मतदारसंघात कुठल्या पाच गोष्टींना असणार प्राधान्य

**कुठल्याही भागाचा विकास हा तेथील पयाभूत सुविधांवर अवलंबून असतो. उद्योग स्थापना, कृषी क्षेत्राला चालना, प्रक्रिया उद्योगांवर भर, दर्जेदार रस्ते निर्मिती, बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण या पाच गोष्टींवर काम करणाऱ्यावर माझा प्रामुख्याने भर असणार आहे.**

### शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या बळ देण्यासाठी काही योजना आहेत का?

**या मतदारसंघात धान, मक्याचे सर्वाधिक उत्पादन घेतले जाते. तर काही शेतकरी आता ऊस लागवड करीत आहेत. त्यामुळे धान, मका यावर प्रक्रिया उद्योग, ऊस कारखाना स्थापन करुन शेतमालाचे मूल्यावर्धन करुन शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या बळकट करण्याचा प्रयत्न असणार आहे.**

### वनहक्क जमिनीचे पट्टे वाटपाचा प्रश्न मार्गी लागणार का?

**अर्जुनी मोरगाव मतदारसंघात वनहक्क जमिनीच्या पट्ट्यांची समस्या मार्गी लावण्यासाठी माझा सुरुवातीपासूनच भर राहिला. कुठल्याही पदावर नसताना काही दिवसांपुर्वीच अनेक शेतकऱ्यांना वनहक्क जमिनीचे पट्टे मिळवून दिले. उर्वरित शेतकऱ्यांना ते मिळवून देण्यावर भर राहील.**

### महिला, युवकांना दिशा देण्यासाठी काही योजना आहेत का?

**महायुती सरकारने समाजातील प्रत्येक घटकाचा विकास करण्यासाठी अनेक योजना सुरु केल्या आहेत. पण योजनांची माहिती अनेकांना नाही. त्यामुळे या योजना ज्यासाठी त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यावर माझा भर असणार आहे.या योजनांच्या माध्यमातून अनेकांना दिशा देण्याचे काम केले जाईल. महिला बचत गटांसाठी बाजारपेठ, ग्रामसंघाची स्वतंत्र इमारत निर्मिती, युवकांना कौशल्यावर आधारित शिक्षण उपलब्ध करुन देण्यावर माझा भर असणार आहे.**

### गोवारी समाजबांधवांच्या घरकुलाचा प्रश्न सोडविणार का?

**या भागात मच्छीमार, गोवारी समाजबांधवांची संख्या अधिक आहे. त्यांचे अनेक प्रश्न आ–हेत. ते मार्गी लावण्यावर भर असणार आहे. मच्छीमार गोव–ारी समाजबांधवांना प्राधान्याने घरकुल मिळवून देण्यावर माझा प्रयत्न असणार आहे.**

### रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी काही योजना आहेत का?

**अर्जुनी मोरगाव मतदारसंघातील अर्जुनी मोरगाव, गोरेगाव, सडक अर्जुनी या तिन्ही तालुक्यातील एमआयडीसीमध्ये उद्योगांची स्थापना करुन त्या माध्यमातून युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण करुन देण्यासाठी माझ्याकडे रोड मॅप तयार आहे.**

## खासदारांची पहिलीच अग्निपरीक्षा

**गोंदिया:** विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडी आणि महायुतीच्या खासदारांची पहिली अग्निपरीक्षा होत आहे. विदर्भाचा विचार करता ६२ जागांवर सर्वाधिक आपल्या आघाडीतील उमेदवाराच निवडून यावे, यासाठी १० खासदारांचा कस लागणार आहे, स्वपक्षासह आघाडीचे जेवढे आमदार निवडून येईल, त्यावरच पुढच्या लोकसभेचेही गणित अवलंबून असणार आहे. त्यामुळे हे दिव्य कसे पेलणार, याकडे लक्ष लागले आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत विदर्भातून महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसचे ५, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रत्येकी १. तर महाायुतीतर्फे भाजपचे २ आणि शिवसेना शिंदे गटाच्या एका खासदाराने विजय मिळविला. २०१९ मध्ये भाजप ५, शिवसेना ३ तर आघाडीकडून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रत्येकी १ अशी स्थिती होती. विधानसभेचा विचार करता २०१९ मध्ये भाजपने २९, शिवसेना (एकसंघ) ४, काँग्रेस १५, राष्ट्रवादी काँग्रेस (एकसंघ) ६, प्रहार २, स्वाभिमानी १ आणि अपक्ष उमेदवारांनी ५ जागांवर विजय मिळविला.

२०१४ मध्ये तब्बल ४४ जागांवर भाजपचे विजय साकारला होता. शिवसेना ४, काँग्रेस १०, राष्ट्रवादी १, अपक्ष १ आणि इतर १ अशी ६२ जागांची स्थिती होती. या निवडणुकीत विदर्भातून महायुतीला किती आणि महाविकास आघाडीला किती जागा मिळणार हे पाहण्यासारखे असेल. विदर्भात सर्वाधिक जागा पटकावणारा पक्षच राज्यात सरकार स्थापन करतो. त्यामुळे विदर्भाकडेच सर्वांचेच लक्ष ला–गलेले असेल आणि नेत्यांचेही विदर्भच लक्ष्य असेल.

### भंडारा-गोंदियात आघाडी मिळणार?

| भंडारा–गोंदिया लोकसभा मतदारसंघातील स्थिती | | |
|---|---|---|
| घटक | 2019 | 2014 |
| युती | 1 | 5 |
| आघाडी | 3 | 1 |
| अपक्ष | 2 | 0 |



**लोकसभेच्या भंडारा–गोंदिया मतदारसंघात डॉ. प्रशांत पडोळे यांनी भाजप उमेदवाराचा पराभव करीत काँग्रेसचा झेंडा रोवला. २०१४ च्या निवडणुकीत भाजप, त्यानंतर पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अशी स्थिती होती. त्यामुळे लोकसभा निवडणूक ही अटीतटीची झाली. ततच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजीत पवार गटाचे कार्यकारी अध्यक्ष खा.प्रफुल्ल पटेल यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. त्यात पटेल यांनी ताकद दाखवित पटोले यांच्यावर भारी पडले. तीच स्थिती विधानसभा निवडणुकीतही असणार आहे. लोकसभेंतर्गत तुमसर, भंडारा, साकोली, अर्जुनी मोरगाव, तिरोडा आणि गोंदिया या मतदारसंघचा समावेश होतो. महाविकास आघाडीचा विचार करता त्यापैकी चार मतदारसंघात काँग्रेस आणि दोन मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे उमेदवार रिंगणात आहेत. २०१४ मध्ये खासदार भाजपचे असल्याने नित्र वेगळे होते. त्यावेळी युतीचे तब्बल ५ आमदार विजयी झाले होते. यावेळी खा. पडोळे हे महाविकास आघाडीला कशाप्रकारे विजय मिळवून देतात, याकडे दोन्ही जिल्ह्यातील मतदारांचे लक्ष लागलेले आहे.**

### गडचिरोलीत महाआघाडीच्या जागा वाढणार काय?

| गडचिरोली लोकसभा मतदारसंघातील स्थिती | | |
|---|---|---|
| घटक | 2019 | 2014 |
| युती | 3 | 5 |
| आघाडी | 3 | 1 |



**गडचिरोली–चिमुर लोकसभा मतदारसंघात यावर्षी उलटफेर झाला. भाजप उमेदवाराचा पराभव करीत महाआघाडीतर्फे काँग्रेसचे नामदेव किरसान यांनी विजय साकारला. या मतदारसंघात गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, गडचिरोली जिल्ह्या–तील आरमोरी, गडचिरोली, अहेरी आणि चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी व चिमुर या विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. २०१९ मध्ये महाविकास आघाडी आणि महायुतीचे प्रत्येकी ३ आमदार येथून विजयी झालेले होते. त्यामुळे ही संख्या वाढविण्याचे आव्हान खा. किरसान यांच्यासमोर असेल. या निवडणुकीत महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसचे ५ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून १ उमेदवार रिंगणात आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या उमेदवारांच्या विजयासाठी रणांगणात उतरावे लागणार आहे. दुसरीकडे या लोकसभा मतदारसंघांतर्गत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचाही मतदारसंघ येत असून खासदारांसह वडेट्टीवार यांचीही प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. पूर्व विदर्भात महाविकास आघाडीला भक्कम करण्याचा रस्ता हा गडचिरोली लोकसभेतूनच जातो हे विशेष.**

## जिल्ह्यात ६४ उमेदव–ारात फक्त २ महिला उमेदवार निवडणूक रिंगणात

**गोंदिया :** येत्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील चार मतदारसंघात मतदान होणार आहे. ४ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी ३९ उमेदवारांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे.

आता निवडणूक रिंगणात ६४ उमेदवार असून या ६४ उमेद–वारात फक्त २ महिला उमेदवार रिंगणात आहेत,त्या सुध्दा अपक्ष. यामध्ये ६३–अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून १९ उमेदवार आहेत.यामध्ये निता निलकंठ साखरे या महिला उमेदवार अपक्ष रिंगणात आहेत.

६४– तिरोडा मतदारसंघातून २१ उमेदवार रिंगणात अशून वनिता बेनीलाल ठाकरे या महिला उमेदवार अपक्ष म्हणून रिंगणात आहेत.गोंदिया व आमगाव विधानसभा मतदारसंघात मात्र एकही महिला उमेदवार रिंगणात नाही.

## संपादकीय

# मतदारराजा जागृत हवा

देशात १८व्या लोकसभेच्या निवडणुका १९ एप्रिल ते १ जून, २०२४ दरम्यान सात टप्प्यात घेण्यात आल्या होत्या. याचा निकाल ४ जून २०२४ रोजी जाहीर झाला. आपल्या महाराष्ट्र राज्यातील निकालाचा विचार करता राज्यात सरासरी ६१.२९ टक्के निकाल लागला. मात्र एकाही जिल्ह्यात १०० टक्के मतदान झाले नाही. महाराष्ट्र राज्यातील ४८ मतदारसंघातील मतदानाचा अभ्यास केल्यास सर्वात जास्त मतदान गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात ७१.८८ टक्के, तर सर्वात कमी मतदान मुंबई दक्षिण मतदारसंघात ५०.०६ टक्के मतदान झाले. महाराष्ट्र राज्यात हे मतदान पाच टप्प्यांत घेण्यात आले होते. आपल्या राज्यात सध्या विधानसभेच्या निवडणुकांचा रणसंग्राम जोरात चालू आहे. राज्यात २८८ विधानसभा मतदारसंघ असून विधानसभेच्या निवडणुका विविध टप्प्यांत न होता दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी एकाच टप्प्यात होत आहे.

राज्यामध्ये मतदार राजांचा विचार करता राज्यात ९,७०,२५,११९ एकूण मतदार आहेत. त्यासाठी निवडणूक आयोग दिवाळीच्या उत्सवाबरोबर राज्यातील निवडणुकीचा उत्सव कशाप्रकारे शांततेत पार पडेल व मतदानाची टक्केवारी कशी वाढेल या दृष्टीने सुट्टीच्या दिवशीसुद्धा निवडणूक कर्तव्यावर असणारे सेवक वर्ग घड्याळ्याच्या काट्याकडे न पाहता काम करीत आहेत. तसेच राज्यातील मतदान अधिक सुलभ पद्धतीने व्हावे यासाठी विविध समित्या स्थापन करून समित्यांच्या मार्फत काम चालू केले आहे. या समित्यांमध्ये विविध कार्यालयातील सेवक वर्ग एकत्र गुण्यागोविंदाने काम करताना दिसत आहेत. मतदारांमध्ये जागृती होण्यासाठी निवडणूक आयोगाच्या वतीने देशात दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. मात्र या दिनाचे तरुण पिढीला काहीही देणे-घेणे नसते. आपल्या देशात लोकशाही आहे. निवडणुका हा लोकशाही प्रक्रियेचा मुख्य भाग आहे. मतदारसंघातील समस्या सोडविण्यासाठी प्रतिनिधी निवडून दिले जातात. तेव्हा आपल्या मतदारसंघाचा विचार करून मतदार राजाने निवडणुकीच्या दिवशी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आपल्या मतदार केंद्रावर जाऊन कोणाच्याही आश्वासनांना बळी न पडता आपल्या समस्या जो उमेदवार अगदी प्रामाणिकपणे सोडवेल त्याला आपले गोपनीय मत द्यावे. आपल्या देशातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तीला मतदानाचा अधिकार आहे.

त्याप्रमाणे निवडणूक आयोगाकडे नोंदणी करून आयोगाचे ओळखपत्र घ्यावे. जरी आयोगाचे ओळखपत्र नसले तरी पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, केंद्र अथवा राज्य शासकीय सेवकांचे ओळखपत्र, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, खासगी कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबूक, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्टकार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, निवृत्तिवेतनाची दस्तावेज, संसद, विधानसभा, विधान परिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, आधारकार्ड, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र आणि कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्टकार्ड हे मतदानासाठी ग्राह्य पुरावे धरले जाणार आहेत. तेव्हा यापैकी एक जरी पुरावा असेल तरी मतदान करता येणार आहे. त्यासाठी त्यांचे मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. तेव्हा महाराष्ट्र राज्यातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तींनी लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान केलेच पाहिजे.

महत्त्वाची बाब म्हणजे, राज्याच्या विकासाच्या दृष्टीने नेता निवडावा तो सुद्धा सक्षम असावा. त्याला स्वत:चे निर्णय स्वत: घेता आले पाहिजेत, अशा खंबीर नेत्याला मतदान करावे. तसेच तरुणांनी आपल्या राज्याच्या विकासासाठी नि:पक्षपातिपणे जो काम करतो त्यालाच मतदान करा अशी मतदारांमध्ये जागृती करावी. प्रसिद्धी माध्यमाद्वारे जाहिरात करणे, मतदानाचे महत्त्व मतदार राजाला समजण्यासाठी त्या आनुषंगाने पथनाट्य, सार्वजनिक ठिकाणी घोष वाक्य लिहिणे, मतदानाच्या संदर्भात पत्रके वाटावीत. तसेच एक व्यक्ती एक मत याची जाणीव करून द्यावी. त्यामुळे मतदार राजाला आपल्या एका मताची किंमत समजेल. यावेळच्या विधानसभेच्या निवडणुका अतिशय चुरशीच्या होणार आहेत. तेव्हा निवडणुकीच्या दिवशी मतदाराने कोणत्याही प्रकारच्या दबावाखाली न राहता आपल्या हक्काची जाणीव करून आपला मतदानाचा हक्क बजावावा. मतदान हा देशातील प्रत्येक मतदाराला भारतीय राज्य घटनेने दिलेला अधिकार आहे. त्याची कुठेही पायमल्ली होता कामा नये. तरच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारी लोकशाही आपल्या देशात नांदेल. तेव्हा मतदानाची जाणीव मतदार राजाला करून दिली पाहिजे. त्यासाठी देशातील लोकशाही प्रगल्भ होण्यासाठी प्रत्येक मतदार राजाने राज्याच्या हिताच्या दृष्टीने २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाचा हक्क बजावला पाहिजे.

**रवींद्र तांबे**

# निवडणूक कर्तव्यावर अनाधिकृत गैरहजर आढळल्याने

## अजय रहांगडाले व हेमंत लेंढे निलंबीत

**गोंदिया :** महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अनुषंगाने ६५-गोंदिया विधानसभा मतदारसंघ अंतर्गत अजय यशवंत रहांगडाले, शाखा अभियंता, लघु पाटबंधारे, जि.प., उपविभाग गोंदिया आणि हेमंत वसंत लेंढे, ग्रामपंचायत अधिकारी पं.स.गोंदिया यांची स्थिर सर्वेक्षण पथक, पतंगा मैदान, आमगाव रोड, गोंदिया येथे नियुक्ती करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी गोंदिया यांनी १० नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री ९.४५ च्या सुमारास स्थिर सर्वेक्षण पथक, पतंगा मैदान, आमगाव रोड, गोंदिया येथे भेट दिली असता अजय रहांगडाले, शाखा अभियंता, लघु पाटबंधारे, जि.प., उपविभाग गोंदिया पथक क्र.२ (नियुक्तीच्या वेळी दुपारी २ ते रात्री १० पर्यंत) आणि हेमंत वसंत लेंढे, ग्रामपंचायत अधिकारी पं.स.गोंदिया प्रमुख पथक क्र.३ (नियुक्तीच्या वेळी १० ते सकाळी ६ पर्यंत) हे रात्री ११ वाजता पर्यंत आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी अनाधिकृत गैरहजर आढळून आले असल्याने, संबंधितांनी आपल्या कर्तव्यात निष्काळजीपणा व बेजवाबदारपणा दाखवून आपल्या कर्तव्यात गंभीर स्वरुपाचे कसुर केले असल्याने संबंधिताविरुध्द तात्काळ प्रभावाने निलंबनासारखी कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे.

त्याअर्थी अजय रहांगडाले, शाखा अभियंता, लघु पाटबंधारे, जि.प., उपविभाग गोंदिया पथक क्र.२ आणि हेमंत लेंढे, ग्रामपंचायत अधिकारी पं.स.गोंदिया प्रमुख पथक क्र.३ हे निवडणूक कामकाज कर्तव्याच्या ठिकाणी अनाधिकृत गैरहजर आढळून आल्याने आपल्या कर्तव्यात कसुर केल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने कार्यवाहीस पात्र ठरत असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ३ मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम. यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन त्यांनी अजय रहांगडाले, शाखा अभियंता, लघु पाटबंधारे, जि.प., उपविभाग गोंदिया पथक क्र.२ आणि हेमंत लेंढे, ग्रामपंचायत अधिकारी पं.स.गोंदिया यांना तात्काळ प्रभावाने निलंबीत केले आहे. त्यामुळे निवडणूक कामकाज कर्तव्यावर असलेल्या कोणत्याही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी अनाधिकृत गैरहजर राहू नये असे याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)**

# ओबीसी लोकांची मानसिकता

सर्वप्रथम परमपूज्य ड़ॉ बाबासाहेब आंबेडकर ह्या आपल्या उद्धारकर्त्याचे कोटी कोटी ऋण व्यक्त करू ज्यांनी ओबीसी प्रवर्गात येणाऱ्या शेकडो पिढ्यांचे, ओबीसी लेकरांचे कल्याण व्हावे म्हणून संविधानात आपल्या बुद्धी चातुर्याने ३४० वे अनुच्छेद समाविष्ट करून ओबीसी विकासाचा मार्ग सुकर करून दिला. तसेच ओबीसी लोकांसाठी अहोरात्र संघर्ष करणाऱ्या सर्व ओबीसी व इतर बहुजन लेखक, विचारवंत, कार्यकर्ते नेते ह्यांचे ऋण व्यक्त करूया.

महाराष्ट्र आणि तामीलनाडू राज्यातील भटके विमुक्त हे केन्द्राच्या सूचित ओबीसी म्हणून आरक्षण घेतात. भटके विमुक्त हा काही प्रवर्ग नाही. भटके विमुक्तां मधील जमाती भारतातील विविध राज्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी प्रवर्गात समाविष्ट आहेत. अनुसूचित जाती आणि जमाती ह्यांचे लोकसभेत राजकीय प्राबल्य नको म्हणून भटके विमुक्त ही खेळी केली आहे येथील कावेबाज व्यावस्थेनी.ह्या लेखात भटके विमुक्त हेही ओबीसी आहेत.

**बहुसंख्य ओबीसी लोकांची मानसिकता बघा:**

पोट भरलेल्या बहुसंख्य ओबीसी लोकांना स्वताला ओबीसी म्हणवून घेण्याची लाज वाटते.त्यामध्ये श्रीमंत असलेले ओबीसी, प्रस्थापित राजकीय पक्षात कार्यरत असलेले ओबीसी, व्यावसायिक असलेले ओबीसी, ओबीसी आरक्षण घेवून कर्मचारी, अधिकारी, शिक्षक आणि प्राध्यापक झालेले ओबीसी, मोठे शेतकरी असलेले ओबीसी, जाती व धर्माची श्रेष्ट्वाची भावना असलेले ओबीसी ह्यांना स्वताला ओबीसी म्हणवून घेण्याची प्रचंड लाज वाटते. असे ओबीसी सर्व सामान्य असलेल्या ओबीसीसाठी, बारा बलुतेदार ओबीसीसाठी, भटक्या विमुक्तांसाठी कार्य करुच शकत नाही. असे प्रस्थापित ओबीसी मात्र ओबीसी आरक्षण बरोबर घेतात. चोरुन लपुन ओबीसी आरक्षण घेतात. ओबीसी आरक्षणाला खरा धोका अशा लोकांकडूनच आहे.ह्या प्रस्थापित गुलाम ओबीसी लोकांनी सर्व सामान्य ओबीसी लोकांना आरक्षण विरोधी असलेल्या प्रस्थापित राजकीय पक्षांच्या दावनीला बांधलेले आहे.

बहुसंख्य हिन्दू ओबीसी आणि बहुसंख्य मुस्लिम ओबीसी दंगली मध्ये एकमेकांचे गळे कापतात, एकमेकांची घरे जाळतात, एकमेकांचा द्वेष करतात. ओबीसी आरक्षण आणि इतर सवलती मात्र घेतात.ओबीसी आरक्षण हे हिन्दू मधील ओबीसी, मुस्लिमा मधील ओबीसी, सिख ओबीसी, लिंगायत समाजातील ओबीसी लोकांना लागू आहे.

बहुसंख्य अज्ञानी ओबीसी लोक खाजगीकरणाचे ताकदीने समर्थन करतात. सरकार सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण करून संविधानिक आरक्षण समाप्त करत आहे.हे बहुसंख्य ओबीसी लोकांना समजत नाही. आंबेडकरवादी, समाजवादी आणि, द्रविडी पेरियारवादी, साम्यवादी विचारांचे राजकीय पक्ष, सामाजिक संघटना खाजगीकरणाला विरोध करतात हे बहुसंख्य ओबीसी लोकांना समजत नाही.

छत्रपती शिवाजी महाराज ह्यांनी बहुजन समाजाच्या लोकांना मावळा म्हटले होते. त्यांनी कुठलाही भेदभाव न करता सर्वांना समान न्याय दिला होता.महात्मा फुले ह्यांनी बहुजन समाजातील लोकांना शुद्र आणि अतिशूद्र म्हटले होते.त्यांनी त्यांच्यात प्रचंड जागृती घडवून आणली होती. रामास्वामी पेरियार ह्या द्रविड नेत्याने ओबीसी मध्ये एक जबरदस्त चेतना निर्माण केली,त्यांनी ओबीसी लोकांमध्ये विवेकवादी विचार पेरला,त्यांनी ओबीसी लोकांना अंद्धश्रद्धायुक्त धार्मिक विचार आणि आचरणातून मुक्त केले, ओबीसी ड़ॉ बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी बहुजन समाजातील लोकांची OBC,SC,ST अशी वर्गवारी करून त्यांना संविधानिक आरक्षण मिळवून दिले.बहुसंख्य ओबीसी लोकांना त्याचे काही महत्व नाही.बहुसंख्य ओबीसी लोक हे फुले शाहू आंबेडकर पेरियार ह्यांना आदर्श मानत नाहीत.

बहुसंख्य ओबीसी लोकांना जइउ चे श्रेपस षीं माहिती नाही.कारण असंख्य ओबीसी हे प्रचंड प्रमाणात उदासीन आहेत. आपल्या हिताचे विषय समजून घेण्यासाठी वाचन करावे लागतें, अभ्यास करावा लागतो.पोथी पुराण वाचून ज्ञान प्राप्त होत नसते.

बहुसंख्य ओबीसी लोक ओबीसी आरक्षणाला जातीयवाद समजतात. जाती आहेत म्हणून जाती आधारित आरक्षण आहे हे बहुसंख्य ओबीसी लोकांना माहित नाही. शेकडो वर्षे जातीच्या नावाने नागवलेल्या,.फसवलेल्या, प्रताड़ित केलेल्या, उपेक्षित ठेवलेल्या, सतावलेल्या लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची व्यवस्था आहे हे बहुसंख्य ओबीसी लोकांना माहित नाही. वाचत नाही म्हणून समजत नाही.

बहुसंख्य ओबीसी लोक आपल्याला मिळालेल्या संविधानिक आरक्षणाला निर्लज्जपणे विरोध करतात.आणि जेव्हा वेळ येते तेव्हा आरक्षण घेतात. बहुसंख्य ओबीसी लोक एकीकडे ओबीसी आरक्षणाला विरोध करतात आणि आपली मुले मुलीं १० व १२ पास झाल्या नन्तर व नोकरीच्या वेळी ओबीसी आरक्षण घेतात. अशी बहुसंख्य ओबीसी लोकांची दुटप्पी भूमिका असते. बहुसंख्य ओबीसी लोक देशात सुरु असलेल्या ओबीसी जातनिहाय जनगणना किवा राखीव जागांसाठी आंदोलन किवा चर्चेकडे दुर्लक्ष करतात.दिशाभूल झालेले ओबीसी ओबीसी जातनिहाय जनगणना करण्यास विरोध ही करतात.जात निहाय जनगणने काय काय मिळणार आहे ते असंख्य ओबीसी लोकांना समजलेले नाही.

बहुसंख्य ओबीसी लोक प्रिंट मीडिया किवा इलेक्ट्रॉनिक मीडियात ओबीसी संदर्भात येणा?्या बातम्यांकड़े ढुंकुन ही बघत नाहीत.ओबीसी लेख,ओबीसी संदर्भातील माहिती घेत नाहीत. बहुसंख्य ओबीसी लोकांना Creamylayer, Non-creamylayer म्हणजे काय ते समजत नाही.Creamylayer ची अट का लावली, कुणी लावली, कधी लावली, तेव्हा कुणाचे सरकार होते हे असंख्य ओबीसी लक्षात ही घेत नाही.

बहुसंख्य ओबीसी लोक आपल्या परिवारात आपल्या लेकरांशी ओबीसी आरक्षण,ओबीसी हक्क अधिकार ह्या बाबत अजीबात चर्चा करत नाहीत. जसे अनुसूचित जाती, जमाती भटके विमुक्त ह्यांच्या परिवारात चर्चा होते तशी चर्चा अजीबात करत नाहीत. बहुसंख्य ओबीसी लोक ओबीसी प्रवर्ग, ओबीसी आरक्षण चर्चा सुरु झाली की अस्वस्थ होतात,चर्चेतुन पळ काढतात, विषय बदलतात.

बहुसंख्य ओबीसी लोक संविधानापेक्षा जास्त महत्व आपल्या धर्माला देतात.ओबीसीला धर्मात कोणतेही स्थान नाही. बहुसंख्य ओबीसी लोक संविधान विरोधी लोकांचे ऐकुन ओबीसी आरक्षणाला विरोध करतात.असे अर्धवट ओबीसी इतरांचे नुकसान करण्यास मागे पुढे पाहत नाहीत. बहुसंख्य ओबीसी लोक आपल्या स्वतासाठी व आपल्या मुलामुलींसाठी चोरुन लपुन आरक्षण घेतात आणि आम्ही गुणवत्तेच्या भरोशावर शिक्षण आणि नोकरी मिळविली असे निर्लज्जपणे सांगतात.

बहुसंख्य ओबीसी आमदार आणि खासदार हे ओबीसी आरक्षणावर चर्चा देखील करत नाहीत.त्यांना ओबीसी विषयावर चर्चा करायची लाज वाटते.ओबीसीतील असंख्य राजकारणी लोकांना आज ही मंडल आयोग समजलेला नाही.असंख्य ओबीसी राजकारणी प्रस्थापित राजकीय पक्षांचे गुलाम आहेत. बहुसंख्य ओबीसी लोक ओबीसी आरक्षण,मंडल आयोग,ओबीसी हक्कासाठी लढनाऱ्या ओबीसी नेत्यांचा प्रचंड द्वेष करतात.

बहुसंख्य ओबीसी लोक ओबीसी आरक्षण, मंडल आयोग, ओबीसी हक्कासाठी लढणाऱ्या, संघर्ष करणाऱ्या समाजवादी नेते लालू प्रसाद यादव, मुलायम सिंग यादव, शरद यादव, नीतीश कुमार, रामविलास पासवान, बहुजन आम्बेडकरवादी नेते कांशीराम साहेब, मायावती, एड प्रकाश आंबेडकर ह्या नेत्यांचा प्रचंड द्वेष करतात.ह्या नेत्यांनी मंडल आयोग लागू व्हावा, ओबीसी मुला-मुलीना आरक्षण मिळावे म्हणून १९९० च्या दशकात सम्पूर्ण भारतात प्रचंड मोठे आंदोलन करून सरकार ला झुकवले होते. व्हीपी सिंह सरकारला मंडल आयोग लागू करण्यास भाग पाडले होते.

बहुसंख्य ओबीसी तरुण १९९० च्या दशक़ात मंडल आयोगाला विरोध करण्यासाठी इतरांच्या भूलथापांना बळी पडले होते.आपल्या बुद्धिने विचार न करता इतरांचे हस्तक झाले होते.आज ही असंख्य ओबीसी लोकांची मानसिकता बदललेली दिसत नाही. मराठा, गुज्जर, जाट, पाटीदार लोक लोकशाही मार्गाने आरक्षणासाठी प्रचंड मोठे आंदोलन उभे करतात परंतु त्यांना आरक्षण मिळत नाही हे ओबीसी लोकांच्या लक्षात येत नाही.आपणास आरक्षण मिळाले त्याचे ओबीसी असंख्य लोकांना महत्व नाही.

बहुसंख्य ओबीसी लोक देवा धर्माच्या कार्यालाच समाज सेवा मानतात.३६५ दिवसांचे ३६५ व्रत करतील पंरन्तु संविधान दिन साजरा करणार नाही. बहुसंख्य ओबीसी तरुण गणेशोत्सव, दुर्गाउत्सव, श्रीराम नवमी, हनुमान जयंती, दसरा, दिवाळी अशा उत्सवात दिसतात पंरन्तु ओबीसी आंदोलनात दिसत नाहीत. ओबीसी आन्दोलनाकडे तुच्छतेने बघतात. जैन, सिख, मुस्लिम समाजातील काही जाती ओबीसी आरक्षण घेतात परंतु तेही ओबीसी चर्चा करताना कुठेही दिसत नाही. तेही आपल्या धर्माला जास्त महत्व देतात. भारताचे संविधान त्यांच्या ही ध्यानी मनी नाही. भारताच्या संविधानाने भारतातील अल्पसंख्यक लोकांना सुरक्षित ठेवले आहे. परंतु भारतातील अल्पसंख्यक देखील संविधानाला महत्व न देता आपल्या धर्माचा उदोउदो करतात.

बहुसंख्य शिक्षित, उच्च शिक्षित ओबीसी लोकांना संविधान म्हणजे काय स्वातंत्र्याच्या ७० वर्षा नन्तर ही समजलेले नाही. संविधान म्हणजे आपल्या कल्याणाचा जाहिरनामा आहे हे त्यांना माहितच नाही. बहुसंख्य ओबीसी महिलांची तर अजुनच बिकट स्थिती आहे. ओबीसी महिलांच्या तर ओबीसी आरक्षण, ओबीसी हक्क हे काय अजुन ध्यानी मनी नाही. ओबीसी स्त्रियां मध्ये कमालीचे अज्ञान आहे. पूजा,अर्चा, उपास,तापास, सन, तेवार करण्यात ओबीसी स्त्रियांचे जीवन संपुन जाते. संविधानिक आरक्षण मिळाले म्हणून ओबीसी स्त्रियां शिक्षण, नोकरी मध्ये दिसत आहे. जागृत ओबीसी महिला मात्र ओबीसी आरक्षण, ओबीसी जनगणना करण्यासाठी किल्ले लढ़वत आहेत. परंतु अशा महिलांची संख्या अत्यल्प आहे.

बहुसंख्य ओबीसी लोक तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती च्या आरक्षणाला निर्लज्जपणे विरोध करतात.त्यांचा प्रचंड द्वेष करतात. बहुसंख्य ओबीसी लोकांना तर आपली स्वताची भूमिकाच नाही. इतरांच्या बुद्धीने कामे करणारे असंख्य ओबीसी लोक आहेत. बहुसंख्य ओबीसी लोक तर चिमुटभर लोकांचे नेतृत्व स्विकारुन स्वताला धन्यता मानतात. बहुसंख्य ओबीसी तरुणांनी तर धार्मिक लोकांच्या आन्दोलनात सहभागी होवून आपलें जीवन बर्बाद करून घेतलेले आहे.ओबीसी तरुणांच्या भरोशावर चिमुटभर लोक सत्ताधीश झाले आणि अजुन ही होत आहे.

बहुसंख्य ओबीसी लोकांना फुले शाहू आंबेडकर पेरियार ह्यांचे नाव घेण्याची लाज वाटते. असंख्य ओबीसी लोकांना आपलें आदर्श महापुरुष कोंण आहेत हेच माहिती नाही.ज्या महापुरुषांनी ओबीसी बहुजनांच्या उत्थानासाठी आपलें सम्पूर्ण आयुष्य खर्ची घातले त्यांना स्मरण करण्याची असंख्य ओबीसी लोकांना लाज वाटते. बहुसंख्य ओबीसी लोकांना समाजवाद, साम्यवाद, आम्बेडकरवाद, गांधीवाद हे काय आहे ते समजत नाही.

बहुसंख्य ओबीसी लोक आपलें राजकीय सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक शोषण करणाऱ्या, हक्क हिरावून घेणाऱ्या लोकांना साथ देतात. त्यांचे गुलाम बनून राहण्यात असंख्य ओबीसी लोक आनंद मानतात. बहुसंख्य ओबीसी लोकांना आपली राजकीय भूमिका काय असावी हेच कळलेले नाही. आपल्या हिताचे बोलणाऱ्या ओबीसी लोकांच्या राजकीय पक्षाला असंख्य ओबीसी लोक मतदान देखील करत नाहीत. प्रस्थापित राजकीय पक्षांची मात्र गुलामी करतात.

बहुसंख्य ओबीसी लोकांचे मतदान निश्चित नाही.जाती,धर्माच्या नावाने मूर्ख बनविणाऱ्या राजकीय पक्षाला मतदान करून आपले हक्क गमावून बसतात. ५२ ते ५४ टक्के लोकसंख्या असलेल्या ओबीसी लोकांची अवस्था मेंढरांसारखी झाली आहे.देशात ओबीसी लोकसंख्या निम्मी असून देशाचे राष्ट्रपती, प्रधानमंत्री, मुख्य न्यायाधीश, राजदूत, राज्यपाल, मुख्यमंत्री, सेना प्रमुख, हवाई दल प्रमुख, नाविक दल प्रमुख ओबीसी नाहीत. ४ टक्के ब्राम्हण, ४ टक्के बनिया, ७ टक्के राजपूत ठाकुर, १३ टक्के अनुसूचित जाती, ८ टक्के अनुसूचित जमाती, २ टक्के सिख, १२ टक्के मुस्लिम लोकांमध्ये जी राजकीय परिपक्वता आहे,जो निर्धार आहे, जो निश्चय आहे, जी जाणीव आहे ती ५४ टक्के ओबीसी लोकांमध्ये नाही.

देशातील प्रस्थापित राजकीय पक्षांत ओबीसी लोक कार्यकर्ते म्हणून कामे करतात. तिथे त्यांना नेते होण्याची संधी अजीबात नाही. तेथील ओबीसी लोक आपल्या अज्ञानी, गरीब, वंचित ओबीसी लोकांना प्रस्थापित राजकीय पक्षांच्या दावणीला बांधतात.त्यांचे शोषण करतात, अन्याय करतात.

५२ ते ५४ टक्के ओबीसी लोकसंख्या असलेल्या समाजाने अभ्यास करण्याची गरज आहे.गंभीर चिंतन करण्याची गरज आहे. आपली भूमिका निश्चित करण्याची गरज आहे. इतरांची गुलामगिरी करण्याची सवय सोडण्याची गरज आहे.संविधान वाचून समजून घेण्याची गरज आहे. आपले हक्क आणि अधिकार समजून घेण्याची गरज आहे. सामाजिकदृष्ट्या संघटीत होण्याची गरज आहे. सामाजिक शक्ती निर्माण करण्याची गरज आहे. ओबीसीसाठी संघर्ष करणाऱ्या योद्धयांना सहकार्य करण्याची गरज आहे. त्यांना मदत करण्याची गरज आहे. त्यांचा संघर्ष समजून घेण्याची गरज आहे.

ह्या देशातील राजकीय सत्ता, प्रशासकीय सत्ता,आर्थिक सत्ता,शिक्षण सत्ता, प्रचार प्रसार सत्ता, औद्योगिक सत्ता आपल्यां हाती घेण्यासाठी ओबीसी मधील बुद्धिजीवीं लोकांनी अत्यंत प्रामाणिक राहून प्रबोधन करण्याची नितांत नितांत गरज आहे.

**बलदेव आड़े**
(९८९०९१४४८०)
संयोजक, ओबीसी वॉरियर्स मिशन
संघटक-संविधान जागरूकता मंच

# सण-उत्सवाचा निखळ आनंद घालवण्यासाठी : सोनं लुटा...धन लुटा...जन लुटा!

दसऱ्याच्या पर्वावर सोनं लुटा असं सांगितलं गेलं. प्रतिकात्मक लूट. लुटलेली आपट्याची पानं सोनं म्हणून देण्यात येतात. आणि याच दिवशी सोनं खरेदी करण्यासाठी झुंबडही उसळलेली असते सोनाराच्या दुकानात. का? तर खरेदीचा मुहूर्त. नेमके ह्याच दिवशी सोने खरेदी करण्यासाठी मुहूर्ताचे खूळ कसे प्लांट करण्यात आले असेल? कधीपासून केले असेल? कुणी, कशासाठी केले असेल?

मुहूर्त हा पंडितांचा पोटार्थी उद्योग, तर सोनं विकून मलाईदार नफा लाटणं शेटजींचा उद्यम. एकाच दिवशी सोन्याची खरेदी विक्रीची गडगंज उलाढाल. चातुर्वर्णाच्या चौकटीत त्यांचा त्यांचा तो धर्म शेटजी भटजी इमानेइतबारे पाळतात शूद्रातिशूद्र मात्र गंडविले, भोंदाडले जातात.

बरं दिवाळीच्या धनत्रयोदशीला तोच कित्ता. सोनं विकत घेणे म्हणजे पाचपन्नासाचा चिरीमिरीचा सौदा होय का? तोळाभर सोनं पाऊण लाखाच्या घरात पोहोचलेले. सोने खरेदी करणे म्हणजे सामान्य माणसाच्या कित्येक दिवसाच्या मेहनतीची कमाई. पै पै जमा केलेली पुंजी -लक्ष्मी-ऐन दिवाळीच्या तोंडावर खर्च करून वर्षभर हापाहाप- व्यापाऱ्यांना लखलाभ. शेटजी भटजी मालामाल.

त्यातही व्यापारी किती हुशार! सोन्याचांदीचे दागिने ज्या दराने विकले जाते तेच अलंकार काही दिवसांनी गिऱ्हाईक मोडायला निघाला तर त्याला हमखास चोट बसली म्हणून समजा. सोनं विकणारे संघटित शेटजी कसे आपलपोटे नियम बनवून, दागिना घडवताना डाग लागले म्हणून सोनं कमी दराने लोकांकडून मोडित घेतात. पण सामान्य माणसाचा सोन्याचा हव्यासही कमालीचा वाढवलेला. शोधूनही लंकेची पार्वती सापडणार नाही. पार्वती सारखेच शंकरही. सणासुदीला सोनं खरेदीचं आणि सोनं पांघरून नाना तऱ्हेचे दारिद्र्य लपवण्याचे वेड आपसूकच लागलेले कसे असू शकेल.

वास्तविक पाहता विजयादशमी आणि दिवाळी हे दोन्ही सण ग्रामीण कृषी जीवनाशी निगडित आहे. घटस्थापनेचा सण हा नवनिर्मितीचा उत्सव आहे. हा भूमी आणि माता या दोघींच्या ठायी असलेल्या सर्जनशीलतेविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा सोहळा होय. त्यांच्याकडे असलेल्या या विशेष शक्तीमुळेच प्राचीन काळापासून भूमी आणि माता यांचे साम्य दाखविण्याचे प्रयत्न झाले आहेत. भूमिला माता आणि मातेला भूमी मानण्याची घटना हा त्याचाच एक भाग होय. शिवाय शेतीचा शोध स्त्रियांनी लावला, असेच या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. त्यामुळे हा उत्सव कृषीसंस्कृतीचे नेमके दर्शन घडविणारा आहे. तसेच दिवाळीचा महा-उत्सव अत्यंत आनंददाचा आणि कृतज्ञता व्यक्त करणारा सण. “खरे तर दिवाळीचा हा सगळा सण अतिशय कृतज्ञतापूर्वक बळीमहोत्सव साजरा करण्याचा आहे. त्याचे मूळचे स्वरूप बळीराजाला आणि कृषीला केंद्रस्थानी ठेऊन निश्चित करण्यात आले आहे.”(शिवधर्म गाथा)सण- उत्सव आणि कृषिसंस्कृती यांचा अनोन्य संबंध दाखवणाऱ्या अनेक महत्वपूर्ण सांस्कृतिक खाणाखुणा विशेषतः ग्रामीण आणि कृषक समाजाच्या या सणांच्या साजरा करण्याच्या पद्धतीत दिसतात. ते एकप्रकारे लोकोत्सव वाटतात. तीन चार दशकापूर्वी गावाकडे बलिप्रतिपदा यादिवशी दिवाळीची धामधूम असायची. सकाळ-पहाटेपासून बायाबापडे पोरंसोरं सगळी कशी कामात व्यग्र दिसायची. या गायगोधनाच्या दिवशी घरोघरच्या गायी सजवण्यासाठी गायींना अंघोळ घालणे, शेळ्या म्हशींनाही स्वच्छ करून त्यांची सजावट करणे हा अग्रक्रमी कार्यभाग. लक्ष्मीपूजन वगैरे वाण्याव्यापाऱ्यांचा पूजेचा दिवस. त्या दिवशी दुकानदारांच्या दुकानात लक्ष्मीपूजन असायचं. महागडे- भारी आवाजाचे फटाके परिसर दणाणून सोडत, दुकानदारांच्या धनिकशाहीचा टेंभा मिरवावा तसे. त्या दिवशी बरेच शेतकरी कष्टकरी दिवाळीची खरेदी करायचे. दुकानदारांकडे खोऱ्याने पैसा येत, गिऱ्हाईकाच्या घरचा पैसा धन लक्ष्मी व्यापाऱ्यांच्या गल्लयात विराजमान. दुसऱ्या दिवसाच्या भरगच्च गायगोधनि उत्साहासाठी, बळीउत्सवासाठी.

गायी म्हशी शेळ्या सजवण्यासाठी सामान गावगुराखी गायधन्याकडे पोहचून द्यायचे. गायींना रंगवून, शिंगांना मोरपीसाचे मखर लावून, पाठीवर झूल टाकून, पायाला घुंगरू बांधून सजवून , मग गुराखी शिवारातून परत वाजतगाजत फटाक्यांच्या आतिषबाजी सह घरोघरी फिरत. गुराखी गायधन्याच्या घरी गेले की गायीची नब गुराख्याची पूजा, ओवाळणी होऊन, गुराख्याला- धान्य पैसा- राखण मिळत. वर्षातून एकदा गोपालास ही मिळणारी ओवाळणी लाखमोलाची वाटे. त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय असायचा.

आजही अनेक ठिकाणी अशाप्रकारे दिवाळी साजरी केली जाते. गोधन हा कृषिसंस्कृतीचा मौलिक ठेवा होय. वैदिकांच्या अनेक यज्ञात गोवंश, अश्व बळी जात. गोपालकृष्णाने इंद्राचा यज्ञ मोडून काढून एकप्रकारे पशुहत्येस अटकाव केला. कृष्णाने गोधन राखून गोधनाचे संरक्षण, संवर्धन केले. कृषिसंस्कृतीचा हा वारसा कृषकांनी जीवापाड जपून ठेवला. बलिप्रतिपदा यादिवशी आपल्या प्राणप्रिय न्यायी बळीराजाचे स्मरण करून या गोधनाचा कृतज्ञतापूर्वक उत्सव भूमीपूत्र साजरा करतात. दिवाळीची ही महत्ता सणांच्या बाजारीकरण, व्यावसायिकिकरण, ब्राम्हणीकरणामुळे काळानुरूप काळवंडून जात आहे. कृषिसंस्कृतीशी निगडित उत्सवांचे वैदिकिकरण होऊन त्यावर पुरोहित व्यापारी भटजी शेटजी वर्गाचा लगाम कसला गेलाय. त्यावरील काजळी दूर सारुन सिंधुजनांची संस्कृती उजळ केली पाहिजे.

दानशूर समन्यायी बळीराजाच्या स्मरणार्थ साजरा होणारा बलिप्रतिपदा सण. या दिवशी आया बहीणी पती, पिता, भाऊ यांना ओवाळून

इडा पिडा टळू दे
बळीचे राज्य येऊ दे

अशा दुर्दम्य आशेने आपल्या बळीराजाची आठवण करतात. आपली प्रजा सुखी असल्याचे पाहण्यासाठी या दिवशी बळीराजा भूवर येतो, म्हणून हा बळीवंश उत्साहाने दिवाळी अर्थात बलिप्रतिपदा हा उत्सव साजरा करत आलेला आहे. श्रमदान करून कृषिसंस्कृतीशी इमान राखून सकल समाजाचे भरणपोषण करणाऱ्या या कष्टकरी बंधुभगिनींना समता ममता बंधुभाव न्याय असणारे बळीराजाचे राज्य यावे असेच आजही वाटते. कपटी वामनाच्या वंशाच्या शोषकांपासून होणारी पिडा टळू दे असेच वाटते.

या दिवाळी बलिप्रतिपदेच्या पर्वावर
इडा पिडा टळू दे
बळीचे राज्य येऊ दे अशी हजारो वर्षे आस लागलेली आहे.

पण शेटजी भटजी नी तमाम अवैदिक परंपरेचे ब्रँडिंग करुन धर्माच्या साच्यात बसवले. एवढे की, निखळ आनंद देण्यासाठी उदयास आलेले सण उत्सव आता धर्मांध उन्मादाच्या सावटाखाली विवेकी समाजाला हिणकस वाटू लागले. सणांच्या बीभत्सपणावर बोलू लागले की त्यांना धर्मद्रोही लेखणे फार अवघड राहिलेले नाही.

सोनं खरेदी करण्याचं खूळ जसं मस्तकात घुसवले तसंच काहीसं फटाक्यांचीही स्टोरी. एकाच दिवशी लाखो करोडो रुपये मोलाचे फटाके फोडून एवढी संपत्ती ची राखरांगोळी. आणि पदरात पडते प्रदुषण, अनारोग्य, आबालवृद्धांची आबाळ, नाककानघसात्वचा विकार, आजारी जणांना धोकादायक त्रास, अशी जीवित हानी, तर आगी लागून भौतिक साधनसंपत्तीची राख. म्हणून आता शासकीय यंत्रणाही फटाकेमुक्त दिवाळी साजरी करा. प्रदुषण टाळा. पर्यावरण रक्षण करा अशी जाहिरातवजा विनंती करतात. सामाजिक संस्था फटाके मुक्त दिवाळी साठी प्रबोधन करतात. फटाके मुक्त दिवाळी म्हटलं की पुन्हा दुसऱ्या बाजूने सूर ऐकू येऊ लागतात. दिवाळीलाच फटाके फोडतात का? सामाजिक सुधारणा वाल्यांना हिंदुंचेच सण दिसतात का? असा रडीचा डाव सुरू. आणि मग ‘हिंदु एक झाले पाहिजे’ बटेंगे तो कटेंगे अशा गमजा करत संभ्रम पसरवायचा. चोराच्या उलट्या बोंबा अशी जातकुळी ज्यांची ते हेच! ब्रम्ह्याच्या मुखातून पैदाईस झाल्याची पुडी सोडून, ब्राह्मण क्षेत्रीय वैश्य शुद्र अशी चार वर्णात माणसांची वाटणी केली. एवढ्यावर समाधान झाले नाही तर हजारो जाती-पोटजातीत बटेंगे कार्यक्रम अनिवार्य कम्पलसरी करुन ठेवला. आणि हे घबाड माहीत होऊ नये म्हणून सारे स्त्रीशूद्रातिशूद्र ‘ढ’ कसे ठेवता येईल म्हणून शिक्षण बंद. शिक्षण घेतले तर दंड अशा अमानुष अत्याचाराचे निर्माते निर्देशक आता ओबीसी दलित आदिवासी जागे व्हायला लागले, जातीव्यवस्थेवर बोट ठेवून आमचा वाटा कुठे आहे म्हणून विचार करायला लागले, तर हेच फूटपाडे ‘बटेंगे तो कटेंगे’ म्हणून भिती भरायला लागले. परधर्मीयांची भिती दाखवून उच्चजातवर्ण वर्चस्व कायम ठेवणारी ही खेळी काही नवीन नाही.

असे ब्राम्हणी गुलामीचे सापळे ओळखून भयमुक्त सण उत्सव साजरे केले पाहिजेघे त्यासाठी या देशातील अवैदिक परंपरा, वैदिक धर्मसूत्रांनी केलेली कुरघोडी,लोकायत जैन बुद्ध प्रवाह, जातवर्णीय संघर्ष, धार्मिक सुधारणा, संत परंपरा, सामाजिक लढे आणि लोकशाहीपूरक समता न्याय बंधुता संवैधानिक तरतुदी ध्यानात घेऊन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि पर्यावरण संरक्षण ही मूल्य पायदळी तुडविली जाणार नाही यासाठी कटीबद्ध राहून शोषणमुक्त प्रदुषणमुक्त आरोग्यदायी आनंदायी सण उत्सवाची उज्वल परंपरा कायम ठेवता येईल.

**अनुज हुलके**

# पटेल-पटोलेंची प्रतिष्ठा पणाला

## सध्या स्थानिक प्रचारावरच भर, नेत्यांच्या सभांमधून दिसणार जोर



**गोंदिया:** जिल्ह्यातील चारही मतदारसंघात सध्या निवडणुकीचा जोर चढला आहे. या निवडणुकीत महायुतीकडून भाजपला ३ आणि राष्ट्रवादी १ तर महाआघाडीकडून काँग्रेसला ३ आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला एक जागा मिळाली. युतीत भाजपला जास्त जागा असल्या तरी ही निवडणूक महायुती म्हणून खा. प्रफुल्ल पटेल यांच्यासाठी महत्वाची आहे. तर दुसरीकडे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा गृहजिल्हा असल्यामुळे महाआघाडीच्या चारही जागा त्यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या झाल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली. जसजसा थंडीचा जोर वाढत आहे. तसतशी प्रचारालाही धार येत आहे. प्रत्येकच उमेदवार आपल्या यंत्रणेसह प्रत्येक गावी आणि गल्लीबोळात जाऊन जास्तीत-जास्त मतदारांना भेटण्याचा प्रयत्न करीत आहेत. जिल्ह्यात गोंदिया, आमगाव, अर्जुनी मोरगाव आणि तिरोडा हे चार विधानसभा मतदारसंघ आहेत. या चारही मतदारसंघात यंदा पहिल्यांदाच हायव्होल्टेज निवडणूक होताना दिसून येत आहे. अर्जुनी मोरगाव आणि आमगाव मतदारसंघात भाजपच्या इच्छुकांनी आपल्याच पक्षाविरुद्ध बंड केल्यामुळे निवडणुकीत अधिक ट्विस्ट येणार आहे.

महाआघाडीकडून काँग्रेसने आमगाव, गोंदिया आणि अर्जुनी मोरगाव या मतदारंघाचे तिकीट आपल्या पारड्यात पाडून घेले तर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला तिरोडाची जागा सोडण्यात आली. महायुतीतील भाजपने आमगाव, गोंदिया आणि तिरोडा या मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले तर अर्जुनी मोरगाव मतदारसंघ राष्ट्रवादी अजित पवार यांच्या वाट्याला गेला. जिल्ह्यात काँग्रेस, भाजप आणि दोन्ही राष्ट्रवादी पक्षाचे उमेदवार आहेत. असे असले तरी नाना पटोले यांचा गृहजिल्हा असल्यामुळे चारही जागा निवडून आणण्यासाठी त्यांची कसोटी पणाला लागणार आहे.

दुसरीकडे राष्ट्रवादीचे हेविवेट नेते प्रफुल्ल पटेल यांचीही होम पिच असल्यामुळे चारही मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार निवडून यावेत, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. विजय आणि पराभव या दोन्ही नेत्यांसाठी महत्वाचा ठरणार आहे. एकंदरीत ही निवडणूक दोन्ही नेत्यांसाठी प्रतिष्ठेची झाली आहे. तिरोड्यात शरद पवार आणि गोंदियात नितीन गडकरी यांची सभा सोडली तर अद्यापही मोठ्या नेत्यांच्या सभा झालेल्या नाहीत. रविवारनंतरच खऱ्या अर्थाने मोठ्या सभा आणि आरोप-प्रत्यारोपाच्या प्रचाराला रंगत येणार आहे.

### कोणत्या मतदारसंघात किती मतदार

| मतदार संघ | पुरुष मतदार | स्त्री मतदार | तृतीयपंथी | एकूण |
|---|---|---|---|---|
| अर्जुनी मोरगाव | 1,28,970 | 1,38,173 | 00 | 2,58,966 |
| तिरोडा | 1,32,906 | 1,38,173 | 00 | 2,71,079 |
| गोंदिया | 1,58,042 | 1,67,505 | 09 | 3,25,556 |
| आमगाव | 1,33,767 | 1,35,731 | 01 | 2,69,499 |
| एकूण | 5,53,685 | 5,71,405 | 10 | 11,25,100 |

### पटोले आपल्या निवडणुकीत

**काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गोंदिया जिल्ह्यातील मतदारसंघांचा आढावा घेऊन तिकीट वाटप केले. तिकीट वाटपात काहींना वगळण्यात आल्यामुळे त्यांच्यात नाराजी आहे. जिल्ह्यातील सर्व गट-तट एकत्र आणून महाआाडीच्या उमेदवारांना निवडून आणण्याचे पटोले यांच्यापुढे आव्हाण असणार आहे. मात्र नाना पटोले खुद्द निवडणूक लढत असताना आणि दुसरीकडे प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी असल्यामुळे त्यांना इतर मतदारसंघाकडे लक्ष द्यायला पुरेसा वेळ मिळणार नाही. त्यामुळे त्यांनी आपली यंत्रणा जिल्ह्यात सक्रिय केल्याचे दिसून येत आहे.**

# शेतकऱ्यांचे ३ लाखापर्यंतचे संपूर्ण कर्ज माफ करणार-गोपालदास अग्रवाल



**गोंदिया:** केंद्र आणि राज्यातील विद्यमान महायुती सरकार शेतकरीविरोधी आहे. त्यांच्या शेतकरीविरोधी धोरणामुळे शेतकरी भरडला जात आहे. उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी होऊन नैराश्यात जात आहे.

महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांचे ३ लाखापर्यंतचे संपूर्ण माफ केले जाईल. तसेच लाडकी बहीण योजनेचे अनुदन ३ हजार रुपये केले जाईल. असे आश्वासन गोंदियातील महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांनी ग्रामीण भागात दिले.

गोंदिया मतदारसंघातील डांगोर्ली, मरारटोला, पुजारीटोला, बिरसोला, भाद्याटोला, जीरूटोला, कोरणी, चंगेरा,मुरपार येथे शुक्रवारी आयोजित प्रचारसभेत ते बोलत होते.

यावेळी उध्दवसेनेचे माजी आमदार रमेश कुथे, जिल्हाप्रमुख पंकज यादव, जितेश राणे, अशोक गुप्ता, प्रकाश रहमतकर, सभापती सुनील भालेराव, महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष अनिता मुनीश्वर, वर्षा पटले, सुरेश चौरागडे, विजय बहेकार, प्रदीप ठवरे, देवेंद्र वासनिक उपस्थित होते.

गोंदिया विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगिण विकासासाठी महाविकास आघाडीच्या पाठीशी सक्षमपणे उभे राहा. आघाडीकडे विकासाचे व्हिजन असून सत्तेवर आल्यानंतर महिला, मुलींना बसमधून मोफत प्रवासाची सुविधा, नियमित कर्जफेट करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान दिले जाईल. असे गोपालदास अग्रवाल यांनी सांगितले.

# शेतामालाला भाव नाही अन् किराणा सहित्याची दरवाढ होतेय

## महागाई नियंत्रणावरही बोला, महिलांची सुरक्षा अन् सक्षमीकरणाकडेही हवे लक्ष



**शासनाच्या योजना चांगल्या आहेत; परंतु अनेक गरजू महिला आजही त्यापासून वंचित आहेत. जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढले आहेत. त्यामुळे इतर खर्चात काटकसर करावी लागत आहे. गॅस, खाद्यतेल, किराणा साहित्याचेही दर वाढल्याने आर्थिक गणित कोलमडत आहे.**

**शालिनी खोटेले, मतदार सडक अर्जुनी**

**शेतकरी काबाडकष्ट करुन शेतमाल पिकवितो. परंतु त्याला हमीभाव मिळत नाही. दुसरीकडे महामाईवर नियंत्रण नसल्याने जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत आहेत. ही तफावत दूर करण्यासाठी लोकप्रतिनिधींसह सत्ताधारी आणि विरोधकांनीही काम करावे.**

**सरिता खोटेले, मतदार कोहळीटोला आदर्श**

**वाढलेल्या महागाईत मासिक खर्चाचे नियोजन करताना अडचणी येत आहेत. कितीही काटकसर केली तरी खर्चाचा ताळमेळ बसत नाही. मासिक उत्पन्न आणि महागाईमुळे वाढलेला खर्च यामुळे गृहीणींचेही मासिक गणित बिघडले आहे.**

**अंजली हुकरे, मतदार पदपमूर**

**आज शेतकरी, शेतमजुरांसमोर एक ना अनेक प्रश्न आहेत. अस्मानी संकटामधून शेतीतील उत्पन्न मिळत नाही. काही हाती पडले तर त्याला हमीभाव मिळत नाही. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत असून, आत्महत्या वाढत आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे अधिकाधिक निर्णय शासनाने घ्यावेत.**

**सुनंदा कोरे, मतदार तेढा**

**गोंदिया:** निवडणुकांत आम्ही हे करणार, आम्ही ते करणार म्हणून अनेक उमेदवार येत आहेत. परंतु महागाई नियंत्रणावर कोण बोलत नाही. शेतमालाला हमीभाव देऊ असे सांगतात; परंतु सत्तेत असताना त्यावर कोणीच काही केलं नाही. महिला, मुलींची सुरक्षा तर वाऱ्यावरच आहे. मग महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाचे काय, असा प्रश्न जिल्ह्यातील महिलांनी उपस्थित केला.

विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजत असून, पक्षाच्या उमेदवारांसह अपक्षांनीही प्रचार जोरात सुरु केला आहे. अनेक उमेदवार त्यांचे कुटूंबिय आणि समर्थक गावागावातील मतदारांशी विशेषत: महिलांची संवाद साधून मतदान करण्याबाबत प्रोत्साहित करीत आहेत. कोणी सत्ताधाऱ्यांविरोधात तर कोणी सत्तेत असताना केलेल्या कामांचे गोडवे गात आहे. त्या पार्श्वभुमीवर महिलांशी संवाद साधता असता महिलांनी योजनांचे स्वागत करताना महागाई नियंत्रण, शेतमालाचा हमीभाव व इतर मुद्यांवर प्रतिक्रीया मांडल्या. यासह इतर विषयांकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.


# सरळ लढतीत अंतर्गत धूसफूस ठरणार निर्णायक,लागले लक्ष

## चर्चेतील मतदारसंघ गोंदिया, आजी-माजी आमदार तिसऱ्यांदा आमने-सामने

| २०१४ मधील चित्र | २०१९ मधील चित्र |
|---|---|
| ६२,७०१ | १,०२,९९६ |
| गोपालदास अग्रवाल- काँग्रेस | विनोद अग्रवाल- अपक्ष |
| ५१,९४३ | ७५,८२७ |
| विनोद अग्रवाल- भाजप | गोपालदास अग्रवाल- भाजप |
| ३३,१५० | ८९३८ |
| अशोक गुप्ता- राष्ट्रवादी | अमर वराडे- काँग्रेस |

**गोंदिया:** गोंदिया विधानसभा मतदारसंघातील लढतीत नव्याने चुरस निर्माण झाली आहे. महाविकास आघाडीतील काँग्रेस उमेदवार गोपालदास अग्रवाल आणि महायुतीतील भाजपचे उमेदवार विनोद अग्रवाल यांच्यात हा सामना होत आहे. हे दोघे २०१४,२०१९ आणि आता २०२४ असे तिसऱ्यांदा समोरासमोर लढत आहेत. परिणामी, ही लढत सरळ असली तरी आघाडी व महायुतीमधील मित्रपक्षांमधील थोडी अंतर्गत धूसफूस निर्णायक ठरेल, असे चित्र आहे.

चार विधानसभा मतदारसंघ असलेल्या जिल्ह्यात सर्वांच्या नजरा मात्र गोंदिया विधानसभा मतदारसंघाकडे लागल्या आहेत. येथे आजी-माजी दोन दिग्गज आमदारांसह अन्य पक्ष व अपक्ष असे १७ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणूक प्रचारादरम्यान शह-काटशहाचे राजकारण केले जात आहे. काँग्रेसचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांच्यासाठी घटक मित्रपक्षांनी एकसंघ वज्रमुळ बांधली असून ते प्रचारातसुद्धा सक्रिय दिसत आहेत. हे अनुकूलच वातावरण मतदानाच्या दिवसापर्यंत कायम ठेवण्याचे आव्हान महाविकास आघाडीपुढे आहे. तर महायुतीतील मित्रपक्षांमध्ये अद्यापही समन्वयाचा अभाव दिसून येतो. भाजपचे काही पदाधिकारी शरीरारे जरी उपस्थितीत असले तरी मनाने अद्यापही निवडणुकीत सक्रिय झाले नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे त्यांची नाराजी दूर करुन त्यांन मनाने सहभागी करुन घेण्याचे आव्हान महायुतीच्या उमेदवारापुढे आहे.



### सर्वाधिक मतदारांचा मतदारसंघ

**गोंदिया विधानसभा मतदारसंघात एकूण तीन लाख २५ हजार ५५६ मतदान आहेत. मतदान संख्येप्रमाणेच जिल्ह्यात सर्वाधिक ३६१ मतदान केंद्रे या ठिकाणी आहेत. येथील अपक्ष विद्यमान आमदार विनोद अग्रवाल यांनी भाजपमध्ये घरवापसी करुन कमळ हाती घेतले आहे. तर माजी आमदार गोपालदास अग्रवाल हे सुद्धा त्यांचा मूळ पक्ष काँग्रेसमध्ये परतले आहेत.**

### जिल्ह्यात ४८१ मतदारांचे गृह मतदान

**गोंदिया:**जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षावरील वयोवृध्द नागरिक व ४० टक्केपेक्षा अधिक दिव्यांग असलेल्या ज्या मतदारांनी गृह मतदानाची सुविधा मिळण्याबाबत नोंदणी केली होती.मतदाराच्या घरी जावून गृह मतदान घेण्यात आले. जिल्ह्यात ८५ वर्षावरील ४२४ वयोवृध्द नागरिकांनी व ४० टक्केपेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या ५०८ अशा एकूण ५०८ मतदारांनी गृह मतदानाची नोंदणी केली होती.

# आयाराम गयाराम आम्हाला नको, सक्षम नेतृत्वाला संधी द्या-प्रफुल्ल पटेल



**नवेगावबांध:** अर्जुनी विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीने दिलेल्या उमेदवाराचा मुक्काम पोस्ट हा येथील नाही. ते मुळचे तिरोडा तालुक्यातील आहेत. २००४ मध्ये ते राष्ट्रवादीकडून आमदार राहिले होते. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत सलग दोन वेळा त्यांचा पराभव झाला होता. त्या उमेदवाराचा मुक्काम पोस्ट इथला नाही. त्याच्यामुळे इथले काम करणार नाही. बाहेरचे पार्सल मतदारांनी बाहेर पाठवा, आयाराम गयाराम नको, तर महायुतीच्या सक्षम उमेदवाराला संधी द्यावी, असे प्रतिपादन खा. प्रफुल्ल पटेल यांनी केले.

अर्जुनी मोरगाव मतदारसंघाचे महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार राजकुमार बडोले यांच्या निवडणूक प्रचारार्थ सोमवारी (दि.११) नवेगावबांध येथे प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. खा. प्रफुल्ल पटेल म्हणाले, महायुती सरकारने अनेक योजना राबवून सर्वच घटकांचा विकास साधण्याचा प्रयत्न केला. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांचे, शेतकरी सम्मान योजनेतून शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे काम केले आहे. सरकार शेतकऱ्यांना कृषीची वीज मोफत, युवा प्रशिक्षणाच्या माध्यमातून विकासाचे नवीन पर्व सुरु झाले आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २० हजार बोनस आमच्याच सरकारने दिला. यावर्षी २५ हजार बोनस देऊ,शेतकऱ्यांचा धान अल्पदरात विकावा लागू नये, यासाठी हमीभाव केंद्र सुरु झाली आहेत.

शेतकरी, महिला, युवा याचे भविष्य उज्वल करण्यास सरकार कटिबद्ध आहे. विकासासाठी महायुतीचे उमेदवार राजकुमार बडोले यांच्यामागे सक्षमपणे उभे राहावे, असे आवाहन केले.

यावेळी माजी खा. सुनील मेंढे, उमेदवार राजकुमार बडोले, यशवंत गणवीर, शेषराव गिरीपुंजे, किशोर तरोणे, लोकपाल गहाणे, नामदेव डोंगरवार, चामेश्वर गहाणे, विजया कापगते, नारायण डोंगरवार, रचना गहाणे, हर्ष मोदी, केवळराम पुस्तोडे, विजय रामटेके, एकनाथ बारसागडे, प्रदीप मस्के, विजय कापगते, दयाराम लंजे, अनिषा पठान, सुनीता जायस्वाल उपस्थित होते.

# अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून ४४ वर्षानंतर कमळ गायब

## इतिहासाचा मागोवा, जनसंघ ते भाजपाचा प्रवास अनुभवणारे अनेक मतदार

**अर्जुनी मोरगाव:** अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात यावेळी पहिल्या प्रथमच मतदारांना कमळ चिन्ह दिसणार नाही. आजपर्यंत झालेल्या निवडणुकीत प्रारंभीच्या काळात भाजपचे नांगर धरलेला माणूस (हलदार) हे बोधचिन्ह होते. नंतर १९८० च्या निवडणुकीपासून भाजपाचे उमेदवार कमळ चिन्हावर निवडणूक लढले. कमळ हा चिन्हाचा मतदारसंघात चांगला दबदबा राहिला. यावेळी महायुतीच्या जागा वाटपात मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला आली आहे. त्यामुळे तब्बल ४४ वर्षानंतर पहिल्या प्रथमच कळम चिन्ह नाही.

अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात सर्वप्रथम झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचे अडकू पाऊलझगडे यांच्या रूपाने विजयी पताका रोवली होती. त्यांना दोन पंचवार्षिकमध्ये पुर्वीच्या जनसंघाचे उमेदवार म्हणून नामदेव दिवटे यांनी टक्कर दिली. नंतरच्या निवडणुकीत लाखांदूर विधानसभा मतदारसंघातून हिरालाल भैया यांनी जनसंघाच्या उमेदवारांचासुद्धा पराभव केला होता. १९७७ च्या निवडणुकीत भाजपाचे उमेदवार हलदार या चिन्हावर निवडणूक लढले. १९८० मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून भाजपाने कमळ निवडणूक चिन्ह स्विकारले. कमळ चिन्हावर भाजपाला अनेकदा विजय मिळाला आहे. मतपत्रिकेवर निवडणूक चिन्ह पाहून मतदान करणारे आजही सक्रिय मतदार आहेत.

यावेळी अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रात ईव्हीएम मशीनमध्ये कमळ चिन्ह दिसणार नाही. या निवडणूक रणसंग्रामात उभे राहून दोनदा कमळ चिन्हाविरुन विजयी पताका लावणारे यावेळी चौथ्यांदा उभे राहिलेले राजकुमार बडोले हे आपले राजकीय भवितव्य आजमावीत आहेत.

# कष्टकरी, कामकरी माणसाच्या समस्या दूर झाल्या पाहिजे-बच्चू कडू



**गोंदिया:** माझ्या कष्टकरी, कामकरी गोरगरिबांच्या समस्या मार्गी लागणे गरजेचे आहे. ज्या योजना मोठ्यांना मिळतात, त्या योजना गोर गरिबांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे. शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतच नाही, मायबाप शेतकऱ्यांना न्याय देउन, शेतकरी, कष्टकऱ्यांची ही आमची लढाई आहे, ज्यांना हात नाही, पाय नाही, डोळे नाही, अशा दिव्यांग व्यक्तींसाठी ही संघटना धावून जाते, माझे हात मजबूत करण्यासाठी डॉक्टर सुगत चंद्रिकापुरे यांना आमदार करण्याची गरज आहे, असे बच्चू कडू यांनी सांगितले आहे.

प्रहार संघटनेचे अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे उमेदवार डॉ. सुगत मनोहर चंद्रिकापुरे यांच्या निवडणूक प्रचारार्थ प्रहार संघटनेचे अध्यक्ष तथा आमदार बच्चू कडू सडक अर्जुनी येथील पंचायत समिती जवळील मैदानात उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना बोलत होते. पुढे ते म्हणाले सरकार शेतकऱ्यांना धनासाठी जे रेट ठरवून देते त्यामध्ये शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लुबाडणूक होत असून शेतकऱ्यांनी जागे होण्याची गरज आहे.

यावेळी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, डॉ. सुगत चंद्रिकापुरे, किरण कोरे, प्रहारचे जिल्हाध्यक्ष महेंद्र भांडारकर, तिरोडा येथील पंचायत समिती सदस्य वनिता भंडारकर, वसंत गहाणे, सरपंच माधव तरोणे, गोंडवाना गोंड तंत्र संघटनेच्या जिल्हा महिला अध्यक्ष छायाताई टेकाम, वनिता भंडारकर, मंगेश देशमुख, राष्ट्रपाल तेलतुंबडे, दुलाराम चंद्रिकापुरे, प्रतिभा कुंभरे, मंजुषा चंद्रिकापुरे, दिव्या चंद्रिकापुरे, शशिकला टेंभुर्णी, रघुनाथ चुटे, प्रमिला बहेकार आदी मान्यवर उपस्थित होते, आमदार चंद्रिकापुरे, डॉ .सुगत चंद्रिकापुरे, किरण कोरे आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन राहुल यावलकर यांनी तर आभार चंद्रशेखर चांदेवार यांनी मानले. सभेला हजारोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# सावरटोल्यात लेकीसह जावयांचा सन्मान सोहळा

## सुनील तरोणे व मित्र परिवाराचा अनोखा उपक्रम; सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी



**नवेगावबांध:** सुनील तरोणे व मित्र परिवाराच्या वतीने अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सावरटोला येथे नवविवाहित लेकींसह जावयांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. दिवाळीनिमित्त सासरवाडीत झालेल्या सन्मान, सत्काराने जावई भारावून गेले होते. लेकींच्या डोळ्यांतही आनंदाश्रू वाहले. शनिवार, २ नोव्हेंबर रोजी रात्री ८.३० वाजता हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे व महिलांनी रंगमंचित केलेल्या नाटकाचेही आयोजनही करण्यात आले होते.

दरवर्षी लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्या दिवशी गोवर्धन पूजेच्या दिवशी सावरटोला येथे हा कार्यक्रम नियमितपणे आयोजित केला जातो. कार्यक्रमाचे उद्घाटन पुणे येथील थेरपिस्ट काउन्सिलिंग, गाठी भेटी संस्थेच्या नाट्य कलावंत श्रुती उत्तुरकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. पुण्याचे भारत नाट्य संशोधन मंदिराचे संस्थापक राजेंद्र उत्तुरकर हे अध्यक्षस्थानी होते. पाहुणे म्हणून यावेळी अर्जुनी मोरगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सुशील नलावडे, सरपंच युवराज तरोणे, पोलिस पाटील शंकर तरोणे, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष योगेश लाडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संजय राऊत, पत्रकार रामदास बोरकर, संजीव बडोले, माजी सरपंच भीमराव रामटेके, सामाजिक कार्यकर्त्या शालुबाई कोल्हे, भारतीय सैनिक सचिन शिवणकर, सरपंच कुरुंदाताई वैद्य, राकेश डोये, खुशाल डोंगरवार, यादवराव तरोणे, पांडुरंग भोपे, मनोहर तरोणे, राजेंद्र तरोणे, गोवर्धन मुनेश्वर, वनरक्षक दुधराम तरोणे, नेपाल राऊत, उमरीचे पोलिस पाटील संदीप तरोणे उपस्थित होते.

गावात यावर्षी आठ लग्न झाले. त्यापैकी सात जावई व लेकी या कार्यक्रमात उपस्थित होते. सर्व जावयांचा परिचय झाल्यानंतर जावयांना शाल, श्रीफळ तसेच मुलींना साडीचोळी व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला उपसरपंच सुवर्णा तरोणे, तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्ष सरिता मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य धर्मेंद्र गजबे, दिलीप मेश्रा, कविता चचाने, उर्मिला शिवणकर, महादेव डोये, प्रकाश शिवणकर, डॅनी डोये यांच्यासह गावकरी उपस्थित होते. प्रास्ताविक रामेश्वर राऊत यांनी मांडले, तर बहारदार संचालन सुनील तरोणे यांनी केले. उपस्थितांचे आभार रवीकुमार मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाला ग्रामवासी महिला-पुरुष,आबाल-वृद्ध बहुसंख्येने उपस्थित होते.

### यांचा झाला सन्मान

**सावरटोला येथील मंगलाबाई वलथरे यांची मुलगी वैष्णवीताई, जावई राजेंद्र मांढरे पुतळी, सुल्काबाई मेश्राम यांची मुलगी निशाताई, जावई गणेश मेश्राम खंडाळा, मंदाबाई मेश्राम यांची मुलगी किरणताई, जावई कृष्णा गेडाम येनोडी, हेमराज तरोणे यांची मुलगी यामीनाताई, जावई संदिप भेंडारकर मानेगाव, प्रभुजी ब्राम्हणकर यांची मुलगी आचलताई, सौरभ काळे पवनी, शंकर तरोणे यांची मुलगी अश्वीनी, जावई जयप्रकाश थेर मरेगाव, गणपतजी हेमणे यांची मुलगी संगिता, जावई चेतन मटाले साकोली यांचा भावपूर्ण सन्मान यावेळी करण्यात आला. प्रारंभी सुवासिनी महिला वच्छलाबाई मुनेश्वर शोभाबाई कठाणे पल्लवीताई तरुणे जिजाबाई कठाणे प्रमिलाबाई तरोणे उर्मिलाबाई बारसागडे वैशालीबाई राकडे यांनी जावई व लेखींचे आरती ओवाळून औक्षण केले.**

# आचारसंहितेत अडकली नुकसानभरपाई

## २६ कोटींची मागणी, १० हजार ६६४ हेक्टरमधील पिकांना अतिवृष्टीचा फटका

| तालुकाबाधित | शेतकरी | नुकसान (हेक्टर) | निधीची मागणी |
|---|---|---|---|
| गोंदिया | 13715 | 6035.28 | 16295250 |
| गोरेगाव | 432 | 147.16 | 2022816 |
| तिरोडा | 4191 | 1852.86 | 50027220 |
| अर्जुनी मोर. | 39 | 5.90 | 82250 |
| देवरी | 1151 | 464.16 | 6312576 |
| आमगाव | 3878 | 1259.57 | 17130152 |
| सालेकसा | 2480 | 1060.99 | 17846730 |
| सडक अर्जुनी | 1126 | 248.22 | 6553486 |
| एकूण | 27012 | 10674.14 | 262927772 |



**गोंदिया:** जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पावसाळ्यात १० हजार ६६४ हेक्टरमधील धान पिकाला फटका बसला. त्यासाठी २६ कोटी रूपयांची मागणी केली होती. मात्र राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे आचारसंहिता संपुष्टात येऊन नवीन सरकार स्थापन झाल्यानंतरच अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यासाठी किमान दोन महिने शेतकऱ्यांना प्रतीक्षाच करावी लागणार आहे.

जिल्ह्यात यंदा खरिपात १ लाख ८४ हजार हेक्टरवर धानाची लागवड झाली आहे. यंदा धान पिकासाठी अनुकूल वातावरण असल्याने पीकही जोमदार आले. मात्र, जिल्ह्यात ८ ते १० सप्टेंबरदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती निर्माण होऊन पिकांचे नुकसान झाले होते. अनेक शेतकऱ्यांचीही केलेली रोवणी पुरामुळे वाहून गेली, तर काही शेतकऱ्यांचे धान पीक सडल्याने त्यांना हंगामाला मुकण्याची वेळ आली. अतिवृष्टी आणि पुरपरिस्थितीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून करण्यात आली. यानंतर शासनाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश महसूल व कृषी विभागाला दिले.

कृषी विभागाने नुकसानीचे पंचनामे केले. यात आठही तालुक्यांत एकुण १० हजार ६६४ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले असून २७ हजार शेतकरी बाधित झाले. या शेतकऱ्यांना नुकसानभरपाईसाठी २६ कोटी २९ लाख २७ हजार रुपयांची मागणी जिल्हा प्रशासनाने शासनाकडे पाठविलेल्या अहवालातून केली आहे.

आता शासन नेमके कोणते निकष लावून नुकसानभरपाई जाहीर करते? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. अतिवृष्टीमुळे गोंदिया तालुक्यातील ६ हजार हेक्टर, तिरोडा ४ हजार हेक्टर आणि सालेकसा तालुक्यात २,५०० हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले तर अर्जुनी मोरगाव तालुक्यात सर्वात कमी नुकसान झाले आहे.

# गोंदियात ड्रायपोर्टला मंजुरी लवकरच काम सुरु होणार-नितीन गडकरी



**गोंदिया:–** सध्याच्या घडीला अनेक बांधकामाचे कंत्राट हे राजकीय नेतेच करु लागले असून नेतेच कंत्राटदार झाल्याने यांना कसे काळ्या यादीत टाकणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. सर्वच पक्षाच्या नेत्यांनी राजकारणात कंत्राटदारीकरीता येऊ नये तर समाजकारण व राष्ट्रकारण करण्याकरीता यावे असे केंद्रिय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी म्हणाले. ते गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे भाजप महायुतीचे उमेदवार विनोद अग्रवाल यांच्या जाहीर प्रचारसभेत बोलत होते. त्यांनी याआधी आमगाव येथेही भाजप महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ जाहिर सभेला संबोधित केले.पुढे बोलतांना त्यांनी जातीच्या नावावर राजकारण करतांना चुक असल्याचे सांगत टिका केली. तसेच कुठल्याही परिस्थितीत संविधान बदलणार नाही याची ग्वाही देत विरोधकांच्या भुलथापांना बळी न पडण्याचे आवाहन केले.

गडकरी म्हणाले की, सदर निवडणूक ही गोंदियाच्या विकासाचे व भाग्य घडविण्याची निवडणूक आहे. महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यात ४० टक्के जंगल आहे. विदर्भात ७५ टक्के गौण खनिज आहे, पण त्या माध्यमातून विकास होऊ शकला नाही. वनसंपदा, व्याघ्रपर्यटन आपल्या शेजारी असूनही दुर्भाग्याने आपणाकडून जसे लक्ष द्यायला हवे होते, तसे न दिल्याने पर्यटन रोजगारातून विकास होऊ शकला नाही. पाणी,विज आणि रस्ते या सर्वांची गरज औद्योगिक व्यवसाय करण्यासाठी गरज असते. परंतु आपल्या विदर्भात ते आधी नसल्याने औद्योगिक विकास होऊ शकला नाही. आपण रस्ते मंत्री झाल्यावर दळणवळणाच्या सोयीवर लक्ष दिले. स्वातंत्र्याच्या ६० वर्षानंतर गावांना जोडणारे रस्ते तयार करण्याची योजना तत्कालीन प्रधानमंत्री अटलबिहारी बाजपेयींच्या काळात आली,ती म्हणजे प्रधानमंत्री ग्राम सडक योजना होय. गावांना शहरांसोबत जोडून नवी क्रांती त्यांनी आणली.

पुढे बोलतांना गडकरी म्हणाले, गरीबांना त्यांच्या हक्क अधिकाराच्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देणे महत्वाचे आहे. कपडा, रोटी व घर त्याला ज्या दिवशी मिळेल तो दिवस आपल्या कार्याचा चांगला दिवस राहील. येत्या दोन वर्षात आपल्याला आरटीओ कार्यालयात जाण्याची गरज राहणार नाही. तुम्हची सर्व कामे घरातूनच होणार आहेत. आज गावातील युवकांना रोजगार नाही. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित मालाला भाव नाही हे आम्हाला मान्य करावे लागेल. विकास कामाची इच्छाशक्त ठेवणारा व्यक्ती हवा.आपल्या घरच्या नातेवाईकाना कंत्राटदारी मिळवून देणारा आमदार खासदार नको. गोंदियाला ड्रायपोर्ट मंजूर झालेला असून जागा मिळताच येत्या काही दिवसात ते सुरु होईल व गोंदियातूनच तांदळाचा व्यापार देशविदेशात होईल. नागझिरा नवेगाव सुंदर आहे, त्याचे योग्य मार्केटिंग केल्यास पर्यटकांच्या रांगा आपल्याकडे लागतील असेही म्हणाले.

यावेळी बोलतांना राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल म्हणाले की सध्याच्या स्थितीत राजकारणाचा स्थर घसरत चालला असून आयाराम गयाराम यांच्यावरच सध्या राजकारण अवलंबून आहे. परंतु परिस्थितीनुसार परिवर्तन होत असते असे असतांना विरोधी पक्षाचे उमेदवार यांच्यामुळे मतदारसंघातील जनता अधिक त्रस्त झालेली होती, त्यामुळेच त्यांना मागच्या निवडणूकीत जनतेने पराभवाचा स्वाद चाखायला लावला.तोच स्वाद यावेळच्या निवडणूकीत भाजप राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या उमेदवाराला ७५ हजार मतांनी निवडूण आणावे. गेल्या २५ वर्ष सत्ता हातात राहूनही मतदारसंघाचा विकास करु शकले नाही. त्याच्यामुळे या मतदारसंघातील अनेक योजना पाण्याविणा ६०० कोटी रुपये खर्च करुन तयार करण्यात आल्या, पण एक थेंब पाणी नाही. येथील नाट्यगृह की गाय म्हशींचा तबेला अशाप्रकारचे अनेक काम माजी आमदाराने केले.मात्र विनोद तुम्हालाही सांगतो तुम्ही असे कराल तर गाठ माझ्याशी आहे.

गोंदियाला बाकी लोकांनी घोषणेतच नंबर केले. मात्र आपण काम करुन वास्तविक क्रमांक १ चे सर्वजण विकासाठी येऊन करु. माझ्या नावाच्या मागेही गोंदिया लागलेला आहे. जेव्हा माझ्या गोंदियात स्वच्छतेचे वाभाळे निघाले, विकास नाही अशा परिस्थितीत मलाही मान शरमेने खाली घालावी लागते. या प्रचारसभेत आमदार परिणय फुके, माजी खासदार सुनिल मेंढे,माजी आमदार राजेंद्र जैन, उमेदवार विनोद अग्रवाल यांनीही मार्गदर्शन केले.संचालन दिपक कदम यांनी तर आभार यांनी मानले.

## तब्बल दोन दशकानंतर राजकीय वैर विसरून गडकरी गेले शिवणकरांच्या भेटीला



**गोंदिया:–** निवडणुकीच्या तोंडावर राजकीय वैर विसरत विधानसभा निवडणूकीच्या प्रचाराकरीता आलेले केंद्रिय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांनी भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते माजी खासदार व राज्याचे माजी अर्थमंत्री प्रा.महादेवराव शिवणकर यांची आज त्यांच्या आमगाव येथील निवासस्थानी त्यांची भेट घेतली. त्यांची आस्थेने विचारपूस करीत हात जोडत नमस्कार घेतले.गडकरी हे जवळपास १५-२० वर्षानंतर शिवणकर यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्याशी बोलले.

गडकरी हे आमगाव विधानसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार यांच्या प्रचाराकरीता आमगावच्या बाजार समिती प्रागंणात आले असता, त्या आधी त्यांनी प्रा.शिवणकर यांच्या घरी जाऊन भेट घेतली. गेल्या तीन चार वर्षापासून प्रा.शिवणकर यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने ते आजारी आहेत. त्यांना आजारपणात कुठलीच हालचाल करता येत नसल्याने गडकरी यांनी त्यांच्या घरी जाऊन हातजोडत आस्थेने विचारपूस केली. यावेळी त्यांच्यासोबत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय शिवणकर,माजी आमदार केशवराव मानकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्ह्यातील ५५ पुढाऱ्यांनी केले विधानसभेत प्रतिनिधीत्व

## १४ पुढाऱ्यांना २ ते ५ वेळा संधी

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून आजपर्यंत विधानसभेच्या १३ वेळा सार्वत्रिक निवडणूका झाल्या. गोंदिया जिल्ह्यात एकेकाळी ५ विधानसभा मतदार संघ होता. तर आजघडीला ४ विधानसभा मतदार संघ आहेत. गोंदिया जिल्ह्यातील जनतेच्या आशिर्वादाने जिल्ह्यातील तब्बल ५५ पुढाऱ्यांना विधानसभेत प्रतिनिधीत्वाची संधी देण्यात आली. विशेष म्हणजे माजी मंत्री महादेवराव शिवणकर यांनी गोंदिया जिल्ह्यातून आमगाव विधानसभा मतदार संघाचे तब्बल ५ वेळा विधानसभेत प्रतिनिधीत्व केले आहे. तर राजकुमारी बाजपेई, गोपालदास अग्रवाल यांनी विजयाची हॅट्रीकही मारली आहे.

प्रारंभी गोंदिया परिसर सोपी एन्ड बेरार मोडत होता. १ मे १९६० विदर्भ मराठवाडा व मुंबई प्रांतासह महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यामुळे १९६२ पासून विधानसभा निवडणूका होऊ लागल्या. गोनदिया जिल्ह्याचा समावेश पुर्वी भंडारा जिल्ह्यात होता. असे असतानाही आजच्या गोंदिया जिल्ह्यात येणाऱ्या एकूण विधानसभा क्षेत्र होते. १९६२ मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, आमगाव व सडक अर्जुनी हे पाच मतदार संघ होते. १९७२ पर्यंत ५ मतदार संघ राहिले. त्यानंतर मतदार संघाचा परिसमन झाले. जिल्ह्यात ४ मतदार संघ राहिले. यामध्ये तिरोडा, गोंदिया, गोरेगाव व आमगाव या संघाचा समावेश होता. २००९ मध्ये पुन्हा परिसमन झाले. गोरेगाव विधानसभा मतदार संघ संपुष्टात आला तर अर्जुनी मोरगाव मतदार संघ पुन्हा अस्तित्वात आला. असे असले तरी जिल्ह्यातील मतदार संघाची संख्या ४ कायम राहिली. गोंदिया जिल्ह्याची निर्मिती १ मे १९९९ ला झाली.

सन १९६२ पासून सन २०१९ पर्यंत १३ विधानसभा निवडणुका झाल्या. निवडणुकांच्या माध्यमातून गोंदिया जिल्ह्यातील मतदारांनी आजपावेतो ५५ पुढाऱ्यांना विधानसभेत प्रतिनिधीत्वाची संधी दिली आहे. विशेष म्हणजे काहींना सलग दोनदा तर तीन पुढाऱ्यांना तीनदा तर एका पुढाऱ्याला ५ वेळा विधानसभेत प्रतिनिधीत्वाची संधी मिळाली आहे. त्याचप्रमाणे २२ पुढारी फक्त एकदाच विधानसभेत प्रतिनिधीत्व करु शकले. या २२ पुढाऱ्यांना जिल्ह्यातील मतदारांनी दुसऱ्यांदा संधी दिली नाही. यातील बहुतांश पुढाऱ्यांनी दोन ते तीनदान निवडणुका देखील लढविल्या मात्र क्षेत्रातील जनतेने त्यांना पुन्हा जनमत दिले नाही.



### तीन पुढाऱ्यांची हॅट्रीक

**जिल्ह्यातील गोंदिया व आमगाव या दोन मतदार संघात सलग तीनदा विजय प्राप्त करणारे तीन पुढारी आहेत. गोंदिया विधानसभा क्षेत्रातून राजकुमारी बाजपेई व गोपालदास अग्रवाल या दोन्ही पुढाऱ्यांनी विजयाची हॅट्रीक मारली. तर महादेवराव शिवणकर यांनी आमगाव मतदार संघातून विजयाच्या हॅट्रीकटी नोंद आपल्या नावे केली.**

### महादेवराव शिवणकर ५ वेळा विधानसभेत



**महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून आमगाव विधानसभा क्षेत्र अस्तित्वात आहे. हा मतदार संघ भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. या मतदार संघातूनच जनसंघाने महाराष्ट्रात पहिल्यांदा विजय मिळविला होता. लक्ष्मणराव मानकर हे जनसंघ अर्थात भाजपचे पहिले या मतदार संघाचे आमदार होते. या विधानसभा क्षेत्रातून महादेवराव शिवणकर यांनी ५ वेळा विधानसभेत प्रतिनिधीत्व केले आहे. सन १९७८ मध्ये महादेवराव शिवणकर हे पहिल्यांदा या मतदार संघातून विजयी झाले होते. त्यानंतर १९८० व १९८५ च्या निवडणुकीत त्यांनी सलग दोनदा विजय मिळवून या संघात विजयाची पहिली हॅट्रटिक मारली होती. आमगाव विधानसभा क्षेत्राचे आजपावेतो फक्त ९ पुढाऱ्यांनी प्रतिनिधीत्व केले आहे. यामध्ये महादेवराव शिवणकर वगळता ८ पुढाऱ्यांना एक-एकदाच संधी मिळाली आहे.**

### दोनदा प्रतिनिधीत्वाची अनेकांना संधी

**जिल्ह्यातील ४ व ५ मतदार संघाच्या माध्यमातून विधानसभेत प्रतिनिधीत्वाची संधी पुढाऱ्यांना मिळाली. गोंदिया विधानसभा मतदार संघातून जी.एस. बाजपेई, राजकुमार बाजपेई, कुथे, गोपालदास अग्रवाल यांना दोन व तीनदा संधी मिळाली. तर तिरोडा मतदार संघातून शालीग्राम दिक्षीत, हरिश मोरे, भजनदास वैद्य, विजय रहांगडाले, गोरेगाव मतदार संघातून पी.डी. रहांगडाले, खुशाल बोपचे, गिरजाशंकर नागपुरे तर सडक अर्जुनी मतदार संघातून एस.एस. पाऊलझगडे, राजकुमार बडोले यांना दोनदा प्रतिनिधीत्वाची संधी मिळाली.**

### २० नोव्हेंबर मतदानाच्या दिवशी सर्व आस्थापनांना सुट्टी

**गोंदिया,:** भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर केलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५१ मधील कलम १३५ (ब) नुसार उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या २४ ऑक्टोबर २०२४ अन्वये खालील प्रमाणे आदेश देण्यात आले आहे.

निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही व्यवसायात, व्यापरात, औद्योगिक उपक्रमात किंवा इतर कोणत्याही आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या आणि राज्याच्या विधानसभेच्या निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जाईल. सदर सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समुह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना इत्यादींना लागू राहील.

## आक्षेपार्ह टिप्पणी केल्याबद्दल सुधीर साळीवर गुन्हा दाखल करा



**सडक अर्जुनी:** सध्या विधानसभा निवडणुकीची धामधुम सुरु आहे. त्यात प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते आपापल्या पक्षाच्या प्रचार करीत असतात. परंतु सोशल माध्यमावर एक बातमी व्हायरल होत आहे. प्रचार सभेत सुधीर साळीनामक कार्यकर्त्यांकडून कुणबी समाजाबद्दल आक्षेपार्ह टिप्पी करत कुणबी समाजाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले. यामुळे कुणबी समाजाबांधवांच्या भावना दुखावल्या असून सुधीर साळी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी कुणबी समाजसंघटनेने केली आहे.

यासंबंधाची निवेदन जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी यांच्या नावे तहसीलदारांना देण्यात आले. निवेदनातून सुनील साळी यांच्या वक्तव्यामुळे आम्हा सकल कुणबी समाजाच्या भावना दुखावल्या आहे. अशा वक्तव्यामुळे समाजातील व्यक्तीच्या हातातून काही अनुचित प्रकार घडण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तरी पण शासनाला विनंती आहे की, विकृत व्यक्तीवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अन्यथा कुणबी समाजात उद्रेक होऊ शकते. त्यामुळे साळी यांच्यावर त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे.

शिष्टमंडळात संघटनेचे अध्यक्ष अनिल मुनीश्वर, उपाध्यक्ष तुलसीदास शिवणकर, सचिव दिनेश हुकरे, देवचंद तरोणे, माधव तरोणे, अंकित भेंडारकर, किशोर शेंडे, देवानंद कोरे, निखिल मुनीश्वर, अरविंद मेंढे, प्रेमलाल हत्तीमारे, धनीराम ब्राम्हणकर व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमदार रोहीत पवार यांची मुंडीकोटा, दवनीवाड, तिरोडा व गोरेगाव येथे जाहिर सभा

**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तरुण तडफदार नेते आणि आमदार रोहीत पवार यांची महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार रविकांत भाऊ (गुड्डू) बोपचे यांच्या प्रचारार्थ तिरोडा गोरेगाव विधानसभा मतदारसंघात जाहीर सभेचे आयोजन १३ नोव्हेंबरला करण्यात आले आहे.

१३ नोव्हेबंरला मुंडीकोटा बाजार चौक जयश्री हॉटेल समोर, दुपारी १२:३० वाजता, दवनीवाडा : बाजार चौक, येथे सायं ३:३० वाजता, तिरोडा: जुनी नगरपरिषद मैदान येथे सायं ५:०० वाजता आणि गोरेगाव येथे राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी प्रचार कार्यालय, हिरापूर रोडच्या मागे रात्रि ७:०० वाजता प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सभेला तिरोडा तालुका काँग्रेस अध्यक्ष रमेश टेंभरे, गोंदिया तालुका काँग्रेस अध्यक्ष रमेश अंबुले, गोरेगाव तालुका काँग्रेस अध्यक्ष जगदिश येरोला, भाकप नेते हौसलाल रहागंडाले, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे गोंदिया जिल्हा अध्यक्ष सौरभ रोकडे, रिपाई नेते, आम आदमी पार्टीचे तालुका अध्यक्ष, शिवसेना उबाठा पक्षाचे तालुकाअध्यक्षांनी जनतेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# राजकुमार बडोले यांनी साधला दुर्गम भागातील मतदारांशी संवाद



**अर्जुनी मोरगाव:** अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार राजकुमार बडोले यांनी शुक्रवारी (दि.८) या भागातील आदिवासीबहूल व दुर्गम भागाचा प्रचार दौरा करुन या भागातील मतदारांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.मतदारांनीसुद्धा आपला हक्काचा माणूस म्हणून त्यांच्या अडचणी यावेळी त्यांच्यासमोर मांडल्या. या समस्या ऐकून त्या प्राधान्याने मार्गी लावण्याची ग्वाही राजकुमार बडोले यांनी दिली.

विधानसभा निवडणुक प्रचार दौऱ्यानिमित्त शुक्रवारी त्यांनी क्षेत्रातील ग्राम तिरखुरी, बोलटोला, भरनोली, बल्लीटोला, खडकी, राजोली, तुकुमनारायण, कन्नडगाव, इळदा, जुनेवाणी, धमदीटोला, अरततोंडी या गावांचा दौरा केला. यावेळी त्यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते डॉ. अविनाश काशिवार, भाजपचे लायकराम भेंडारकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार राजकुमार बडोले हे २००९ पासून अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करीत आले आहेत. सामाजिक न्यायमंत्री असतना त्यांनी राज्य पातळीवर अनेक विकासकामे केली. माजी आमदार असतानासुद्धा मतदारांशी नाळ जोडत त्यांच्या समस्या सोडवित असल्याने महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने राजकुमार बडोले यांना या निवडणुकीत उमेदवारी दिली. छोट्या सभेच्या माध्यमातून मतदारांना आपला उमेदवार लढत असून आपले आशिर्वाद काम ठेवण्याचे आवाहन केले.

# राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येताच जातनिहाय जनगणना करणार व शेतकऱ्यांचे ३ लाखापर्यंतच कर्ज माफ करणार-शरद पवार






**गोंदिया:–** राष्ट्रवादी काँग्रेस(श.प.) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार तिरोडा येथील विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)महाविकास आघाडीचे उमेदवार रविकांत खुशाल बोपचे यांच्या प्रचारसभेला उपस्थित राहून गोंदिया जिल्ह्यातून प्रचाराचे रणशिंग फुंकले. यावेळी बोलतांना शरद पवार म्हणाले की, गेल्या ६ महिन्यापुर्वी झालेल्या लोकसभा निवडणूकीत आपण विवेकाचा वापर करुन केलेल्या मतदानामुळे राष्ट्रहितासोबत संविधानाची रक्षा करण्यात आली. आता विधानसभेच्या निवडणूकीच्या काळात दिल्लीतील सरकार हे सर्वसामान्य लोकांच्या हिताचा विचार करणारे नाही. आम्ही महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष एकत्र येत महाराष्ट्राच्या हिताचा विचार करीत सत्तेकरीता एकत्र आलो.आता निवडणूकीतही आम्ही राज्याला विकासाचा प्रवाहात पुढे आणण्याकरीता व राज्यातील दूषीत झालेले वातावरण दूर करण्याकरीता एकत्र आलो आहोत.प्रत्येक विभागात वेगवेगळी पिके घेतली जातात.परंतू दिल्लीतील सरकार उत्पादन खर्चाचा विचार करीत नसल्याने लावलेल्या पिकाला विक्रीच्या वेळी योग्य मोबदला मिळत नाही. शेतकऱ्याला न्याय देणारा, कामगारांना काम देणारे सरकार तुम्हा आम्हाला सर्वांना राज्यात आणायचे आहे. त्यामुळे आम्ही महाराष्ट्रातील जनतेला एक गॅरंटी व विश्वास देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये ५ गोष्टींचा समावेश आम्ही केला आहे. त्यात महालक्ष्मी योजनेत महिलांना ३ हजार रुपये महिंना, महिला व मुलींनी मोफ्फत शिक्षण, शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंतचे कर्ज माफ्फ व नियमित कर्ज फ्फेडणार्याला ५० हजाराची मदतीसोबतच जातनिहायजनगणनेसोबत आरक्षणाची ५० टक्क्याची मर्यादा हटवण्याचा निर्णय आमच्या महाविकास आघाडीने घेतल्याचे प्रतिपादन शरद पवार यांनी केले. ते तिरोडा येथील शहिद मिश्रा विद्यालयाच्या पटागंणावर महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार रविकांत खुशाल बोपचे यांच्या जाहिर प्रचार सभेत आज(दि.०७)बोलत होते.

या प्रचारसभेच्या मंचावर राष्ट्रवादी काँग्रेसचे(श.प.)अध्यक्ष शरद पवार, जेष्ठ नेते अनिल देशमुख, खासदार डॉ.प्रशांत पडोळे, खासदार नामदेवराव किरसान माजी खासदार खुशाल बोपचे, तिरोडाचे उमेदवार रविकांत खुशाल बोपचे(गुड्डू), गोंदियाचे माजी आमदार व उमेदवार गोपालदास अग्रवाल, तुमसरचे उमेदवार चरण वाघमारे, प्रदेश काँग्रेस सचिव पी.जी.कटरे, गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष दिलीप बनसोड,माजी खासदार मधुकर कुकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)जिल्हाध्यक्ष सौरभ रोकडे, शिवसेना उबाठाचे जिल्हाध्यक्ष पंकज यादव, माजी आमदार प्रकाश गजभिये, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष राधेलाल पटले, तिरोडा तालुका काँग्रेस अध्यक्ष रमेश टेंभरे, गोरेगाव तालुका अध्यक्ष जगदिश येरोला, गोंदिया तालुका ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष रमेश अंबुले, जिल्हा महिलाकाँग्रेस अध्यक्ष वंदना काळे, एड.टि.बी.कटरे, तिरोडा बाजार समितीचे संचालक ओम कटरे,मदन पटले, पवन मोरे, रिपाईचे राजकुमार भेलावे, भाकपचे हौसलाल रंहागडाले, संगीता भगत,माया शेंडे, रश्मीताई गौर,रुबीना मोतीवाल, भाग्यश्री केळवदकर, टीना उपवर्शी, चंदा शर्मा, मेघा बिसेन यांच्यासह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार व शिवसेना उबाठा रिपाई घटक पक्षाचे आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राजेश सरकटे यांनी शरद पवार यांच्यावर तयार करण्यात आलेले गीत सादर केले.

राज्यात विकासाकरीता आपण सर्वांना काम करायाचे असून महाविकास आघाडीच्या उमेदवारांना सर्व परीने काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते १०० टक्के सोबत असतील अशी ग्वाही देत तिरोडा मतदारसंघातून रविकांत बोपचे,अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून आपण स्वतःदिलीप बनसोड, गोंदियातून गोपालदास अग्रवाल व आमगाव मतदारसंघातून राजकुमार पुराम, तुमसरमधून चरण वाघमारे या महाविकास आघाडीच्या उमेदवारांकरीता एकदिलाने आपण विजयाचा शिक्का येत्या २० नोव्हेंबरला उमटवण्याचे आवाहन जिल्हा काँग्रेस अध्यक्ष दिलीप बनसोड यांनी मतदारांना केले.

यावेळी बोलतांना तिरोडा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार रविकांत बोपचे यांनी आपण गेल्या निवडणूकीत आपला पराभव झाला, तेव्हापासून आपण कुठलीही चिंता न करता मतदारांच्या सेवेत आजपर्यंत कार्यरत आहे. ामचा मतदारसंघ आदिवासी बहुलअसल्याने त्यांच्या समस्यां सोडवण्याचे काम आपली महाविकास आघाडीच्या माध्यमातून करता येईल. सोबतच नागझिरा नवेगाव व्याघ्रप्रकल्पाचा प्रचार प्रसार करुन व नव्या योजना युवकांकरीता रोजगाराच्या आणून रोजगार देण्याची आपली योजना असल्याचे सांगत जिल्हा परिषद शाळांचे वर्ग सध्या सरकार बंद करीत आहे, त्या शाळा व वर्ग बंद न करता खासगी शाळेसारखे शिक्षण देण्याकरीता आपल्याला काम करायचे आहेत.आरोग्य विभागाचा डोलारा कोळमळलेला असल्याचे सांगत येते आरोग्य केंद्र व रुग्णालयात अनेक साहित्य नसल्याने रुग्णांना सोय नसल्याने त्रास सहन करावे लागत आहे, त्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न आपण निवडून आल्यानंतर करणार असल्याची ग्वाही दिली. आपल्या आमदारकीचा पूर्ण पगार गोरगरीबांच्या मुलांच्या शिक्षणावर व आरोग्यावर खर्च करणार असल्याची घोषणा केली.सोबतच नावाजलेल्या जागृती पतसंस्थेचा सामान्य जनतेचा पैसा सर्वसामान्याना मिळालेला नाही,त्यामुळे आपली सरकार सत्तेत येताच आपण आम्हाला यांचा पैसा परत करण्याकरीता सहकार्य कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

यावेळी बोलतांना शिवसेना जिल्हा प्रमुख पंकज यादव यांनी राज्यातील महायुती सरकारला खाली खेचण्याची वेळ आली महिलामुलासंह आमच्या दैवतांचा अपमान करणाऱ्या राज्यसरकार उखडून फ्फेकत राज्यात महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे यांनी देशातील ७० हजारकोटी रुपयांची शेतकऱ्याना कर्जमाफी देणारे व पुरोगामीत्व जपणारे शरद पवार साहेब असून त्यांनी पुरोगामीत्वाची कास टिकवून ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. धानाची लागवड गोंदिया भंडारा जिल्ह्यात अधिक होते परंतु लागवडीचा अधिक खर्च असल्याने आपली सरकार येताच धानाला भाव वाढवून द्यावे लागेल. राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस साहेब गुजरातला जात असलेल्या उद्योगावर ते राज्य पाकिस्तांनात आहे का असे बोलून टाळतात.

भंडारा-गोंदियाचे खासदार डॉ.प्रशांत पडोळे यांनी महाविकास आघाडीचे नेते शरद पवार साहेब हे राजकारणातील चाणक्य असल्याचे सांगत विरोधकांचे मनसुबे उधळून लावतात. पुर्व विदर्भातील पुर्ण सिंचन प्रकल्प झाल्याने पुर्व विदर्भ सिंचनात अग्रसर राहिले. शेतकरी, कामगारांना न्याय द्यायचा असेल तर महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदान करुन राज्यातील शेतकरी, ओबीसी विरोधी नरकारुपी सरकारला हाकलून लावण्याचे आवाहन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते नितेश कराळे म्हणाले की महाराष्ट्रातील हे तिघाडी सरकार हे गुजरातकरीता काम करणारे असून नागपूरातील वेदांतासारखे प्रकल्प गुजरातल्या नेल्याने विदर्भातील सुशिक्षित युवकांना रोजगारापासून वंचित केले आहे. छत्रपतींच्या पुतळ्यातही भष्ट्राचार करणारे हे राज्यातले सरकार हाकलून लावायचे आहे. बहिणीच्या विरोधात बायकोला निवडणूकीत उभे करणारे लाडकी बहिण योजना सुरु करते यावरुन लाडक्या बहिणोंनो समजा असे म्हणाले.यावेळी तिरोडा-गोरेगाव विधानसभा मतदारसंघातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.